मंगळवार, १९ सप्टेंबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ४९
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • TUESDAY 19 SEPT. 2023 | adhunikkesari.com Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-49 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5



## आज गणरायाचे आगमन

### उत्सवाला धार्मिक ऐक्याचे महत्त्व

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**लखमापूर :** महाराष्ट्रांमध्ये विविध धार्मिक उत्सव साजरे केले जातात. परंतु गणपती उत्सव हा धार्मिक ऐक्याची भावना जपणारा उत्सव म्हणून ओळखला जात असल्याने सर्व देवतांमध्ये श्री गणेश यांना पुजेचा पहिला मान दिला जातो. सर्व प्रकारच्या शुभकार्यात सर्वप्रथम गणपतीचे पुजन केले जाते. शिवपार्वतीचा पुत्र गणपती विद्येचे दैवत मानले जाते. गणेश चतुर्थी हा उत्सव महाराष्ट्र, गुजरात, आंध्रप्रदेश, तसेच संपूर्ण भारत, व विदेशातही मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. ज्या दिवशी भगवान शंकराने गणपतीला हत्तीचे तोंड लावून त्याला जिवंत केले त्या दिवशी गणेश उत्सव साजरा केला जातो. त्या दिवसांला गणेशचतुर्थी असे म्हटले जाते. त्यानंतर ११ दिवस चालणारा हा उत्सव अतिशय आनंदाने व उत्साहाने पार पडला जातो. व हा उत्सव अनंत चतुर्थीला गणपती विसर्जनांने संपतो. गणेश चतुर्थीला गणपतीची स्थापना करतात. या काळात रोज सकाळी व संध्याकाळी गणपतीची आरती केली जाते. त्यांना मोदकांचा प्रसाद दिला जातो. ११ दिवसांनी म्हणजे अनंत चतुर्थीला मुर्तीचे नदीत किंवा तलावात विसर्जन केले जाते. त्यामुळे या उत्सवांला आगळेवेगळे महत्त्व आहे.

गणपतीचा प्रथम उल्लेख प्राचीन हिंदू धर्मग्रंथ असलेल्या ऋग्वेदात मिळतो. दोन रूप मंत्र गणानाम गणपतीम् हवामहे व विशु सिधा गणपती वैदिक गणपती चा स्पष्टपणे निर्देश करतात. जरी हा वैदिक गणपती व सध्या पुजिला जाणारा पौराणिक गणपती एक नसला तरी वेदोत्तर काळात ऋग्वेदातील गणपती ब्रम्हाणस्पती वाचस्पती पासून पौराणिक गजवदन, विघ्नेश्वर, गणेश हे निर्माण झाल्याचे संशोधक मान्य करतात.भारतातील अनार्याच्या हस्ती देवता व लम्बोदर यक्षाच्या एकत्रिकरणातुन गणेश संकल्पना निर्मिली गेली. गणेश या मुळच्या अनार्य देवतेचे आर्यीकरण झाले असावे. हा दुसरा अर्थ लावण्यात येतो. गणेशाचे वाहन उंदीर याच आदिम संस्कृतीचे प्रतीक म्हणून राहिले असावे. इसवी सनाच्या चौथ्या शतकातील कालिदास, इसवीसनाच्या सहाव्या शतकातील भारवी, इसवीसनाच्या पाचव्या शतकातील पंचतंत्र व भारताच्या नाट्यशास्त्रात आतही गणेश देवता दिसत नाही. संकटांचा नाश, विघ्नहर्ता गणपती म्हणून त्याची पुजा केली जाते. भाद्रपद महिन्यातील चतुर्थीला सिध्दि विनायक चतुर्थी असते. हिलाच शिवा असेही म्हटले जाते. गणपत संप्रदायाचे हे महत्त्वाचे व्रत मानले जाते. गणेश चतुर्थीची प्रचलित परंपरा ही खूप जुनी आहे. तसेच गणेशोत्सवाचे आणखीन एक महत्त्व म्हणजे तो काळ पारतंत्र्याच्या असल्याने लोकांनी एकत्र यावे. त्यांच्यात जागृती निर्माण व्हावी हा हेतु त्यामागचा होता.

# आमदार अपात्रतेबाबत तातडीने निर्णय घ्या : सर्वोच्च न्यायालय

## न्यायालयाने राहुल नार्वेकरांना सुनावले

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : आमदारांच्या अपात्रतेसंबंधित आम्ही निर्देश देताना तीन महिन्यांची मर्यादा ठेवली नव्हती, पण सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचा आदर केला पाहिजे, असे सरन्यायाधीशांनी विधासभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना बजावले. तसेच या संबंधित पुढची सुनावणी आता दोन आठवड्यानंतर होणार आहे. आम्ही तीन महिन्यांची डेडलाईन जरी दिली नाही तरी विधानसभा अध्यक्षांनी न्यायालयाचा अवमान करावा, असा त्याचा अर्थ नाही, असे न्यायालयाने राहुल नार्वेकरांना सुनावले. या प्रकरणातील सुनावणीमध्ये वेळकाढूपणा का करता, असा सवालही न्यायालयाने केला.**

आमदारांच्या अपात्रतेसंबंधित निर्देश देताना यावर पुढच्या दोन सुनावणीपूर्वी नेमकीस काय कारवाई केली याची माहिती अध्यक्षांनी द्यावी. अशा पद्धतीने अनिश्चित काळ काम करू शकत नाही, किती वेळेत काम करणार याचे टाईम टेबल विधानसभा अध्यक्षांनी द्यावे, असेही निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

ठाकरे गटाच्या वतीने युक्तिवाद करताना कपिल सिब्बल म्हणाले की, हा खूप गंभीर विषय आहे. पाच अपात्रता याचिका दाखल केल्या आहेत. 2022 मध्ये या प्रकरणी 12 जुलै 2022 पर्यंत उत्तर द्यायचे होते. पण काहीच घडले नाही. या तारखेपर्यंत नोटीस इशू झालेली नाही. तुम्ही



म्हणाला होतात योग्य कालावधीत निर्णय द्यावा. तुमच्या निकालानंतर तीन वेळा त्यांना अर्ज केला 15, 23 मे आणि 2 जून त्यावर काहीच प्रतिसाद नाही. 18 सप्टेंबरला जेव्हा कोर्टाची तारीख आली त्याच्या आधी चार दिवस फक्त दिखावा म्हणून सुनावणी ठेवली. 2022 च्या प्रकरणात म्हणतात की आता आम्हाला कागदपत्रे मिळाले नाही. जुलै 2022 मध्ये उत्तर द्यायचे होते. यांनी सप्टेंबर 2023 मध्ये दिले आणि आता कागदपत्रांचे कारण पुढे करत आहे. अध्यक्ष म्हणतात सेपरेट ट्रायल करायचे आहे. अध्यक्षांच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी भूमिका मांडली. सर्व कागदपत्रांची पाहणी करण्याचा आम्हाला तो अधिकार आहे. अध्यक्षांचे पद हे संविधानिक पद असून त्यांनाही काही अधिकार आहेत.

## 'भारतावर संशय घेण्याचा अनेक लोकांचा स्वभाव'

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** संसदेच्या नव्या अधिवेशनाला सुरुवात झाली आहे. १९ सप्टेंबर म्हणजेच गणेश चतुर्थीच्या दिवशी नव्या संसद भवनात आता देशाचे कामकाज चालणार आहे. त्याआधी जुन्या संसदेतल्या लोकसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपले विचार प्रकट केले. आपल्या भाषणात त्यांनी विरोधकांना टोला लगावला. भारतावर संशय घेण्याचा एक स्वभाव अनेक लोकांचा आहे. स्वातंत्र्य मिळाल्यापासून हेच सुरु आहे. यावेळीही असाच संशय घेतला गेला. मात्र भारताने ताकद दाखवून दिली. आज आपण रोडमॅप घेऊन हजर आहोत. जी २० चे अध्यक्षपद नोव्हेंबर अखेरपर्यंत आपल्याकडे आहे. आज आपल्या सगळ्यांसाठी ही गर्वाची बाब आहे की आपला देश विश्व मित्राच्या रुपाने ओळख तयार करतो आहे. संपूर्ण जग आपल्यात एक मित्र शोधतो आहे. वेदांपासून विवेकानंदापर्यंत जे आपले संस्कार आहेत त्या संस्काराचे हे यश आहे. सबका साथ सबका विकास या मंत्राने आपण जग जोडले आहे, असेही मोदी म्हणाले.

## बाप्पा पाऊस घेऊन येणार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यभरात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये पाऊस झाल्यामुळे शेतीच्या कामांनाही वेग आला आहे. तर काही ठिकाणी मात्र अद्यापही पावसाची अपेक्षा कायम आहे. अशात हवामान खात्याकडून अनेक जिल्ह्यांना पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे.

काही भागांमध्ये पावसाचा जोर वाढल्यामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. यामुळे नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळाल्याची माहिती आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील पुणे, मुंबई, पालघर, ठाणे, रत्नागिरी, रायगड या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. तर राज्यातल्या इतर जिल्ह्यांना ग्रीन अलर्ट असणार आहे. इतकंच नाहीतर कोकणात पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे. मध्य भारतात कमी दाबाचे क्षेत्र पोषक ठरल्याने राज्यात तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस होईल, असा अंदाज आहे. आज सोमवारी कोकण आणि घाट माथ्यावर तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे, तर उर्वरित राज्यात हलक्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. खरंतर, आठवड्याभरापासून पाऊस सुट्टीवर होता. मात्र, आता पुन्हा एकदा पावसाने राज्यात बरसण्यास सुरुवात केली. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये पहाटेपासूनच सोमवारी हलक्या पावसाच्या सरी कोसळल्या. तर दिवसभर ढगाळ वातावरण पाहायला मिळाले. गौरी-गणपतीच्या पार्श्वभूमीवर शहराला पावसाचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी हवामानाचा अंदाज घेत घराबाहेर पडावे तर शेतकऱ्यांनीही हवामानाचा अंदाज घेत शेतीच्या कामांना सुरुवात करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

# चालक दिनानिमित्त पोलिसांकडून चालकांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार

## आरोग्य तपासणी, वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत शपथ


आधुनिक केसरी न्यूज

धाराशिव : जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र.52 वरील महामार्ग पोलीस केंद्र धाराशिव येथील पोलीस वाहतूक अधिकारी व कर्मचारी यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 17/09 रोजी रवींद्र सिंगल सर अप्पर पोलीस महासंचालक (वा.), महाराष्ट्र राज्य, मुंबई, मा. डॉ.अनिता जमादार मॅडम, पोलीस अधीक्षक, महामार्ग पोलीस प्रादेशिक विभाग, छ. संभाजीनगर, मा.श्री डीसले सर, पोलीस उपाधीक्षक म. सु. प., छत्रपती संभाजीनगर, मा. श्री गिरी सर, पोलीस निरीक्षक म.सु.प., छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली चालक दिनानिमित्त महामार्ग पोलीस केंद्र धाराशिव येथे वाहतूक संघटनेचे जिल्हा अध्यक्ष, सचिव, उपाध्यक्ष व चालक या सर्वांचा चालक दिनानिमित्त पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमावेळी महामार्ग पोलीस केंद्र धाराशिव यांच्याकडून अल्प उपहाराचे नियोजनही करण्यात आले.

चालक दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमांमध्ये राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 52 वरून ये-जा करणाऱ्या वाहन चालकांबरोबर महामार्ग पोलीस केंद्र धाराशिव येथील पोलीस अधिकारी व अंमलदार व वाहन चालक यांची नेत्र व आरोग्य तपासणी डॉ.श्री विलास तोडकर, डॉ. श्री सुरेश गंगावणे, डॉ.श्री गरजे, डॉ.श्री कांबळे प्राथमिक आरोग्य केंद्र येडशी यांच्याकडून एकूण 72 वाहन चालकांची तपासणी करण्यात आली.

राज्य परिवहन महामंडळ धाराशिव येथील चालक व NH 52 वरील चालक यांना चालक दिनानिमित्त शुभेच्छा व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा उचित सन्मान करण्यात आला. याचं कार्यक्रमाचे औचित्य साधून वाहन चालक व महामार्ग पोलीस केंद्र धाराशिव येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना वाहतूक नियमाचे पालन करणे बाबत शपथ देण्यात आली.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# स्वयंपूर्ण ग्रामीण भारत

आधुनिक केसरी

तुम्हाला माहितीच असेल की आपल्या पूर्वजांनी बहुतेक सगळी खेडी किंवा नदीकाठी वसवली आहेत. त्यातून पाण्याची गरज भागत असे. मोठमोठी धरणे नसल्याने, त्याचप्रमाणे जंगलतोड झाली नसल्याने नद्या बाराही महिने वाहत्या असत. विहिरींना मुबलक पाणी असे. '
मध्येच श्यामराव म्हणाले, ' भगवान, अरे मागे आम्ही सोपानच्या गावाहून परत येताना या मुलांना फड पद्धतीचीही माहिती सांगितली होती. ' भगवानराव म्हणाले, ' बरोबर आहे. ती पद्धत ग्रामीण भागासाठी खरोखरच फार उपयुक्त होती. त्यामुळे शेतीतील पिकांचे उत्तम नियोजन व्हायचे. सगळे गावकरी एकत्र येऊन गावाच्या गरजेनुसार पिकांची लागवड करीत. त्यामुळे एखाद्याच शेतीमालाचे प्रचंड पीक येऊन त्याचे भाव पडणे किंवा तो माल वाया जाणे यासारख्या गोष्टींना आपोआप आळा बसत होता. शिवाय पाण्याची बचत होत होती. शेतजमिनीचा कस टिकून राहायचा असे अनेक फायदे होतेच. '
' इंग्रंजांच्या आणि मुघलांच्या आक्रमणापूर्वीची खेडी तर फार स्वयंपूर्ण होती. प्रत्येक गावात पंचायत असायची. या पंचायतीचे काम गावातील भांडण तंटे सोडवण्याचे असायचे. जेवढी समस्या मोठी तेवढी पंचायतही मोठी असायची. समस्या लहान तर पंचायतही लहान ! मोठी समस्या असेल तर कधी कधी दोन तीन गावे एकत्र येऊन पंचायत तयार व्हायची. पण त्यामुळे गावातील भांडणे गावातच सुटायची. या पंचायती अशा प्रकारे कुशलतेने न्याय देत असत की वादी आणि प्रतिवादी म्हणजेच भांडण करणाऱ्या दोन्ही पक्षांचे समाधान व्हायचे. ' भगवानराव म्हणाले. ' किती छान व्यवस्था होती नाही न्यायदानाची ! नाहीतर आजकाल आपण पाहतो न्यायालयात कोण गर्दी असते. वर्षानुवर्षे खटले चालत राहतात. प्रचंड पैसा खर्च होतो. शिवाय न्याय मिळाल्यानंतर दोन्ही पक्षांचे समाधान होत नाहीच. त्यातून मग जिल्हा न्यायालय, उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय अशा वाऱ्या सुरु राहतात, ' भार्गवी वहिनी म्हणाल्या. नाहीतर काय. मागे एक चित्रपट पाहिला होता. आता नाव आठवत नाही. पण ' तारीख पे तारीख ' अशा अर्थाचे संवाद त्यात न्यायव्यवस्थेला उद्देशून होते. शहाण्यानं कोर्टाची पायरी चढू नये ही म्हण त्यातूनच आली असावी, ' श्यामलाताई म्हणाल्या. वहिनी, अगदी बरोबर बोललात, ' भगवानराव म्हणाले आणि सगळेच हसण्यामध्ये सामील झाले.आई, मला भूक लागली आहे, ' छोटा चैतन्य म्हणाला.





# आनंदी पहाट

## आभासीकरण जाणून घेऊन सावध होणे आवश्यक

आधुनिक केसरी

आपण प्रत्यक्षांत जे नाहीत ते आहोत असे जगाला दाखवण्याच्या केविलवाणी प्रयत्नांत आपला अहंकार आणि दंभ वाढत असतो, त्यामुळे ती समजण्याची जाणीवच उरलेली नसते. मोठेपणाच्या अट्टाहासाने एक वेळ अशी येतेच कि, अनेक बाबतीत आपला अभ्यास कमी आहे आणि खोटेपणा लपवण्याची धडपड सुरु आहे हे स्पष्ट होते. निर्माण केलेला अभास हा फार काळ टिकत नसतो, हे न समजणे हीच खरी उणिव असते. अभासाचा विपरीत परिणाम काहीवेळा काही विवाहांच्या पश्चात घडून आल्याचे आपल्याला समजते. विवाह निश्चित करताना ग्लॅमर नाही, तर ग्रामर महत्वाचं असतं; केवळ दिखाऊपणा, आभास नाही तर अभ्यास महत्वाचा ठरतो. तिथेदेखील सुरुवातीचा आभास कितीही प्रभाव निर्माण करणारा असला, तरीही कालांतराने प्रभावापेक्षा मूळ स्वभाव आणि एकूणच अभ्यासातील अभाव दिसून येऊ लागतो. सुरुवातीला चमकणारे सोने कालांतराने तांबे असल्याचे कळले कि



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अभ्यासाचा अभास केल्याचे पितळ उघडे पडते. पवित्र मानल्या जाणाऱ्या, विवाहाच्या संस्कारांतून निर्माण होणाऱ्या नात्यासाठी काहीवेळा वधू-वर यांच्या निवडीत देखील अभ्यासाचा अभाव असल्याचे दिसून येते. संपूर्ण आयुष्य सहजीवनाच्या मार्गाने व्यतीत करायचे असते, हे सर्वज्ञात असूनही अवघ्या काही तासांत विवाह निश्चित केले जातात. काहीवेळा अभ्यासाचा अभाव, तर काहीवेळा अभास असल्याचे कळते पण वळत नाही. आपल्या प्रत्येक विचार, वर्तन आणि व्यवहारांत आभासी दुनियेचे आकर्षण फार नसावे कारण नेहेमी अभ्यासच महत्वाचा ठरत असतो. आपण निवडलेल्या करिअरचा केवळ गरजेपुरता आणि अर्थार्जनासाठी उपयोग करून चालणार नाही, तर करिअरमधील स्थिरता आणि आत्मिक आंनद

मिळवण्याचे तंत्र अवगत केले पाहिजे. यासाठी आपण प्रत्येक बाबतीत चिकित्सा केली पाहिजे.



आधुनिक केसरी

## सुखाचा जागर | जाण मना ||

सुख दुःख काय | गोंधळ मिटेना ||
मनाला सुटेना | कोडे काही ||१||
त्रासलो संसारी | सापडेना वाट ||
व्यवहारी घाट | आकळेना ||२||
मौनाचा अनर्थ | जगाने लावीला ||
परी न जाणीला | भावगर्भ ||३||
गर्दभाच्या संगे | गर्दभचि व्हावे ||
अंतरी साधावे | राजहंसा ||४||
संत संगतीचा | चोख व्यवहार ||
सुखाचा जागर | जाण मना ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरूपण

आधुनिक केसरी


देहि मे शरणं दुर्गे जगतः पालिके शिवे |
धर्मकामार्थसिद्ध्यर्थं दुर्गां देवीं नमाम्यहम् ||
९१ || हे दुर्गे, शिवे, जगताचे पालन करणारे, मला शरण दे. धर्म, काम, अर्थ यांच्या सिद्धीसाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

है समीप देखें नहीं, वह देखे सब कोय ।
जरा मृत्यु नहिं ताहि में, कह पण्डित वह कोय
।।१७।।(स्वर्वेद प्रथम मण्डल नवम अध्याय)
०१/०९/१७
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
तो नित्य अविनाशी सत्पुरुष जवळच आहे. त्यास कोणीही पहात नाही, परंतु तो सर्वांना पाहतो. त्याच्यात वृद्धावस्था आणि मृत्यू असत नाही. प्रकृती तसेच आत्म्याच्या तत्त्वभेदास जाणणाऱ्या विद्वानांनी सांगावे की हा कोण पुरुष आहे ?



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

.................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# स्वामी विवेकानंद

आधुनिक केसरी

युवाशक्ती ही कोणत्याही काळात देशातील सामाजिक, राजकीय, आर्थिक,देशहिताचा क्रांती घडवून आणते. हे आजपर्यंतच्या युवाशक्ती द्वारा सिध्द झाले आहे. भाताला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी युवा शक्ती प्रेरक ठरली हे विसरून चालणार नाही. भगतसिंग,सुखदेव,राजगुरू, सुभाषचंद्र बोस, चंद्रशेखर आझाद, स्वातंत्र्यवीर लोकमान्य टिळक,आगरकर, ज्यांच्या पहाडी नेतृत्वामुळे ब्रिटिश ही अचंबित झाले ते विनायक दामोदर सावरकर आंबेडकरांची चौफेर वाचन करून संविधान रचना केली तीही युवावस्थेतचं. स्वामी विवेकानंदांचे अनमोल विचार काळानुरूप किती महत्वाचा आहे . हे समजणे आजच्या युवकांना देशभक्ती व देशसेवा किती गरजेची आहे हे लक्षात रहाणे यासाठी विश्वबंधुत्व दिवसांची'आठवण होणे महत्वाचे आहे. कारण भौतिक चंगळवाद वाढीला लागला आहे. शत्रुराष्ट्र आपली वक्रदृष्टी सतत ठेऊन बसलेला आहे आणि हे आजच्या युवकांनी लक्षात ठेवणे गरजेचे आहे.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# नामात राहणे हा सरळ मार्ग आहे

आधुनिक केसरी

एका बाईला सासरी नामस्मरण करणे कठीण जाई, सासरच्या लोकांना ते आवडत नसे. मी तिला सांगितले, 'लोणी चोरून खाण्याचा परिपाठ ठेवला तरी त्याचा परिणाम शरीरावर दिसतोच. तसे, नाम कुणाला नकळत घेतले तरी त्याचा उपयोग होतोच; म्हणून उघडपणे नाम न घेता आले तरी ते गुप्तपणे घ्यावे, आणि त्याप्रमाणे युक्तीने वागावे.' शरीराला अन्नाची जरूरी असताना जर ते तोंडातून जात नसेल तर नळीने पोटात घालतात, त्यामुळे ते लवकर पोटात जाते; तसे, भावनेच्या नळीने नाम घेतले तर ते फार लवकर काम करते.
एक मनुष्य बैलगाडीतून जातांना रस्त्यामध्ये पडलेला होता. एका सज्जन माणसाने त्याला उचलून आपल्या घरी नेले आणि त्याच्यावर उपचार केले. तसे आपण भगवंताच्या नामात पडून राहावे; त्यात राहिले की कुणीतरी संत भेटतो आणि आपले काम करतो; आपण सरळ मार्गात मात्र पडले पाहिजे. नुसत्या विषयात राहणे हा आडमार्ग आहे; नामांत राहणे हा सरळ मार्ग आहे.
खरोखर, नाम किती निरूपाधिक आहे ! आपण देहबुद्धीच्या उपाधीत राहणारे लोक आहोत, म्हणून आपल्याला नामाचे महत्त्व तितकेसे समजत नाही. संतांनाच नामाचे खरे महत्त्व कळते. विलायत इथून हजारो मैल लांब आहे. तिथे जाऊन आलेल्या लोकांकडून आपण तिथल्या गोष्टी ऐकतो. तिथे आपण पायी जाऊ शकत नाही, कारण ते फार लांब आहे. शिवाय, वाहनामध्ये बसून जावे म्हटले तर मध्ये मोठा समुद्र आहे. तेव्हा, पायाला श्रम न होऊ देता, आपल्याला बुडू न देता, समुद्राचे पाणी पायाला न लागता, समुद्रपार नेणारी जशी आगबोट आहे, त्याचप्रमाणे भगवंताकडे पोहोचविणारे त्याचे नाम आहे.



भगवंत कसा आहे तो आम्ही पाहिला नाही, पण संत त्याला पाहून आले आणि त्यांनी त्याचे वर्णन आमच्याजवळ केले. आम्ही आमच्या कष्टाने त्याला गाठू म्हणावे तर ते शक्य नाही. शिवाय, प्रपंचासारखा एवढा भवसागर मध्ये आडवा आलेला आहे. अशा परिस्थितीमध्ये आपण नाम घट्ट धरले तर सुखाने भगवंतापर्यंत जाऊन पोहोचू.
व्यवहारामध्ये जशी एकाच माणसाला अनेक नावे असतात, तो त्यांपैकी कोणत्याही नावाला 'ओ' देतो, तसे कोणत्याही नावाने हाक मारली तरी एकच भगवंत 'ओ' देतो. निरनिराळ्या गावी असलेल्या सर्व जिंदगीची मालकी खरेदीपत्रातल्या नामनिर्देशाने मिळते, तसे सर्वव्यापी असलेल्या देवाची प्राप्ती त्याच्या नामाने होते. खरोखर, नाम ही कधीही नाहीशी न होणारी जिंदगीच आहे.

# सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी

व आपल्यावर कृपा होत असते. कारण ग्रंथ लिहिणारा त्या ग्रंथातच असतो जसे कि रामदास स्वामिनी दासबोधा बद्दल म्हटले आहे तसेच. तेव्हा तुम्हाला लवकरात लवकर अनुग्रहित व्हावयाचे आहे तर तुम्ही मनाने आधी हे पक्के करा कि मला ग्रंथाची सेवा करणे भाग आहे. तुमचे गुरु तुमचा शोध घेत येतील. तसेच महत्वाचे म्हणजे अनेक विषय एकाच गुरुजींनी शिकवले तर आपली काय अवस्था होइल म्हणजे ते ज्ञान ग्रहण करताना एक अवस्था अशी होइल की आपल्याला कंटाळा येइल तेच वेगवेगळ्या गुरुजीकडून शिकताना कंटाळा येण्याची अवस्था खुप उशीरा येइल म्हणुन गुरु पद एकच असले तरी ते वेगवेगळ्या रुपात अवतरतात ते फक्त ज्ञान देण्यासाठीच तेव्हा हे माझे गुरु ते तुझे गुरु असे काही मनाने कल्पु नये तर त्या कल्पनेलाच गुरु पद एकच हि सवय लवण्या साठीच गुरु सांगतात ती सेवा मनोभावे करावी.



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

कवळाचिया सुखें ।परब्रम्ह जालें गोरखें ।हात गोऊनि खाय मुखें ।बोटासांदी लोणचें ॥१ ॥कोण जाणे तेथें ।कोण लाभ कां तें ।ब्रम्हादिकां दुर्लभ ॥ध्रु.॥घाली हमामा हुंबरी ।पांवा वाजवी छंदें मोहरी ।गोपाळांचे फेरी ।हरि छंदें नाचतसे ॥२ ॥काय नव्हतें त्या घरीं खावया ।रिघे लोणी चोरावया ।तुका म्हणे सवें तया ।आम्ही ही सोंकलों ॥३ ॥कान्होबा आतां तुम्ही आम्ही च गडे ।कोणाकडे जाऊं नेदूं ॥१ ॥वाहीन तुझी भारशिदोरी ।वळतीवरी येऊं नेदीं ॥ध्रु.॥ढवळे गाईचें दूध काढूं ।एकएकल्यां ठोंबे मारूं ॥२ ॥
तुका म्हणे टोकवूं त्यांला ।जे तुझ्या बोला मानीत ना ॥३ ॥
बहु काळीं बहु काळी ।आम्ही देवाचीं गोवळीं ॥१ ॥
नाहीं विटों देत भात ।जेऊं बेसवी सांगातें ॥ध्रु.॥
बहु काळें बहु काळें ।माझें पांघरे कांबळें ॥२ ॥
तुका म्हणे नाहीं नाहीं ।त्याचें आमचें सें कांहीं ॥३ ॥

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, १९ सप्टेंबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari


# गडचिरोली पोलिसांनी घेतला ४० लाखांच्या मोबाईलचा शोध

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** गेल्या दशकभरात माणसाच्या जीवनातील सर्वात महत्त्वाचा घटक बनलेल्या 'मोबाईल' चोरीचे व हरविल्याच्या दररोज देशभरात लाखो तक्रारी येतात. अनेकदा चोरी गेलेला मोबाईल सापडतदेखील नाही. मात्र, गडचिरोली पोलिसांनी मागील दोन वर्षांत 'स्मार्ट' शोध घेत तब्बल ४० लाख किमतीचे जवळपास तीनशे मोबाईल नागरिकांना परत केले. त्यामुळे मोबाईल परत मिळालेल्या नागरिकांनी गडचिरोली पोलिसांचे आभार मानले आहे. सोमवारी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात यावर्षी शोधण्यात आलेले मोबाईल संबंधित नागरिकाला प्रदान करण्यात आले. पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलीस



अधीक्षक अनुज तारे, कुमार चिंता, यातिश देशमुख, सायबर पोलीस प्रभारी उल्हास भुसारी, पोलीस उपनिरीक्षक निलेश वाघ यांच्या प्रमुख उपस्थितीत हरवलेले मोबाईल संबंधिताला परत करण्याचा एक छोटेखानी कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी आलेल्या ६४ व्यक्तींना मोबाईल परत करण्यात आले. हरवलेले मोबाईल सापडल्याने संबंधितांनी आनंद व्यक्त करीत गडचिरोली पोलिसांचे आभार मानले आहे. हरवलेले किंवा चोरी गेलेले मोबाईल शोधण्यात मागील दोन वर्षांत



गडचिरोली पोलिसांचा आलेख वाढता असून २०२२ मध्ये २२ लाख किमतीचे १५० तर २०२३ मध्ये आत्तापर्यंत १८ लाख किमतीचे १३५ मोबाईल शोधण्यात त्यांना यश आले आहे. त्यामुळे एकदा हरवलेला मोबाईल सापडत नाही, ही भावना मनातून काढून टाकत तत्काळ तक्रार केल्यास मोबाईल परत मिळू शकतो, असे पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी यावेळी सांगितले. सोबतच सायबर गुन्हेगारांपासून जनतेने सावध राहावे असेही आवाहन केले.



# गोंदियात मोदींचा वाढदिवस 'राष्ट्रीय बेरोजगार दिन' म्हणून केला साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** तालुक्यातील गंगाझरी येथे १७ सप्टेंबर रोजी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस 'राष्ट्रीय बेरोजगार दिन' म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित युवकांनी 'जूमला नही जवाब दो, युवाओं को रोजगार दो' च्या घोषणा देत तेथील बसस्थानक परिसरात एकत्र होत केक कापला.

गंगाझरी (टिकायतपूर) येथील बसस्थानक परिसरात परिसरातील युवकांनी सायंकाळी एकत्र येऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाच्या निमित्याने 'केक' कापून राष्ट्रीय बेरोजगार दिन साजरा केला. पंतप्रधानांनी १५ ऑगस्ट २०१४ रोजी लाल किल्यावरून प्रत्येक वर्षी दोन कोटी सुशिक्षित बेरोजगारांना शासकीय नोकरी मिळून देण्याची घोषणा केली होती, या घोषणेचे काय झाले? असा प्रश्नही यावेळी सुशिक्षित बेरोजगार युवकांनी उपस्थित करून घोषणाबाजी केली. उपस्थित युवकांच्या मते केंद्र सरकारने जर प्रत्येक वर्षी २ कोटी युवकांना शासकीय नोकरी उपलब्ध करून दिली असती तर आज सुमारे १८ कोटी सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराची संधी मिळाली असती, आणि त्यांच्या मागे अंदाजे ७० कोटींच्या वर नागरिकांच्या कुटुंबाचा राहणीमान उंचावला असता. व त्यांचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकास झाला असता. मात्र, मोदी सरकारचे मंत्री रविशंकर प्रसाद पत्र परिषदेत 'हमने क्या ठेका लेकर रखा है क्या नोकरी देणे का' तर देशाचे गृहमंत्री अमित शहा हे स्पष्टपणे 'ये सिर्फ एक चुनावी जुमला था' असे म्हणतात. यावरून मोदी सरकार फक्त पुंजीपती यांचे सरकार असून सर्व शासकीय यंत्रणा कंत्राटी पद्धतीवर भरून सरकारचे खाजगीकरण करण्यावर भर असल्याचे बोलण्यात आले.

यावेळी माजी पं. स. सदस्य प्रकाश पटले यांच्या हस्ते केक कापून 'राष्ट्रीय बेरोजगार दिन' साजरा करण्यात आला. प्रसंगी सरपंच सोनू घरडे, ग्रा.पं सदस्य महेंद्र धुर्वे, दिगंबर पारधी यांच्यासह गावातील सुशिक्षित बेरोजगार विशाल उके, लोकेश नागभिरे, गौरव लिल्हारे, सिद्धार्थ बोंबार्डे, महेश बबरिया, विनोद कोहपरकर, नामदेव मेश्राम, छगनलाल लिल्हारे, भुमेश्वर ठाकरे, अनमोल वरकडे, धर्मराज बोम्बार्डे, नरेश ईनवाते, रोशन कावळे, वाशिम शेख, सुधाकर वलके, अनमोलसिंग उईके, दशरथ चौधरी, श्रिकिसन मारबदे, दिनेश कुंभरे, महेन्द्र मेश्राम, मंगेश कलसे, सुशील टेकाम शेखर उईके आदी सुशिक्षित बेरोजगार युवक उपस्थित होते.

# अमृत कलश यात्रेने राजुरा शहर दुमदुमले

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी महाराष्ट्र शासन यांचे पत्र दिनांक 5 /9 /2023 अन्वये दिनांक 15 सप्टेंबर 2023 ते 2 ऑक्टोंबर 2023 या कालावधीत स्वच्छता पंधरवडा अभियान साजरे करणे बाबत निर्देश दिले आहेत, या अभियानाचा एक भाग म्हणून इंडियन स्वच्छता लीग 2.0 चा दुसरा हंगाम व सफाई मित्र यांच्या करिता सेवा व सुरक्षा शिबिराचे आयोजन, सफाई कर्मचाऱ्यांना गणवेश वाटप आरोग्याच्या कामातील सुरक्षात्मक साहित्याचा वाटपाचा कार्यक्रम व हैदराबादच्या निजामी राजवटीतून मराठवाडा विभाग 17 सप्टेंबर 1948 ला मुक्त झाला. महाराष्ट्र शासनातर्फे या दिवसाच्या स्मृती भावी पिढीला ज्ञान व्हाव्यात म्हणूनच  17 सप्टेंबरला वाजता झेंडा वंदन करून आणि शपथ ग्रहण करून राजुरा शहराचा स्वच्छता दूत श्री छोटूभाऊ सोमलकर यांच्या हस्ते अमृत कलश यात्रा च्या रॅलीला हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ करण्यात आला. मेरी माटी मेरा देश चे अमृत कलस यात्रा नगर परिषद राजुराच्या प्रांगणातून टिक 8,30 वाजता सुरुवात होऊन शहरातील मुख्य रस्त्याने संविधान चौक, अहिल्याबाई होळकर चौक, उईके चौक ,नेहरू चौक, आंबेडकर चौक, होत परत नगर परिषद राजुरा येथे रॅलीची सांगता करिता आली त्यावेळी नगर परिषद चे मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉक्टर सुरज जाधव यांनी सर्वांना पंचप्राणाची सपंथ ग्रहण करून घेतले. कलश यात्रेच्या स्वागता करीता नागरिकांनी रस्त्यावर पाणी टाकून रांगोळ्या नी रस्ते सजविले होते, त्यानंतर कलश मध्ये आणलेली माती ही प्राशशक सुरज जाधव यांचे स्वाधीन केले व नंतरया अभियानाचा एक भाग म्हणून इंडियन स्वच्छता लीग 2.0 चा दुसरा हंगाम व सफाई मित्र यांचे सुरक्षा करिता त्यांना सुरक्षा किट चे वितरण करण्यात आले आहे. शिवाजी हायस्कूल चे विद्यार्थी तसेच शिक्षक वृंदा ने सुद्धा चांगले सहकार्य केले त्याचप्रमाणे आदर्श हायस्कूल राजूराचे हरित सेनेचे विद्यार्थी व शिक्षक वृंद यांनी सुद्धा कलश यात्रेत आपला सहभाग नोंदविला त्याचप्रमाणे नगरपरिषद राजुराचे सर्व कर्मचारी विजयकुमार जांभुळकर प्रशासकीय अधिकारी, आदित्य खापणे विद्युत अभियंता, उपेंद्र धामणगे करनिरीक्षक, अश्विन कुमार भोई लेखापाल, अक्षय सूर्यवंशी मिळकत व्यवस्थापक, ताजने सर प्रशासन अधिकारी, वीरेंद्र धोटे, संजय जोशी, सुमित खापर्डे पाणीपुरवठा अभियंता, प्रज्ञा धोटे, सुरेखा पटेल, प्रांजली सरपटवार, आदी नि विशेष प्रयत्न करून कार्यक्रम यशस्वी केले.



# प्रत्येकाला उत्तम आरोग्य सुविधा मिळेल अशी यंत्रणा उभारणार

## पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार : 'आयुष्मान भव' जिल्हास्तरीय शुभारंभ कार्यक्रमात साधला संवाद

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** उत्तम आरोग्य ही मानवाची सर्वांत मोठी संपत्ती आहे; तो प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्क आहे ; परंतु पैसा कमविताना आपण आरोग्याकडे दुर्लक्ष करीत आहोत ही वस्तुस्थिती आहे. आरोग्याची वेळेवर तपासणी होणे गरजेचे असून, जिल्ह्यात सुसज्ज आणि अत्याधुनिक आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी दर्जेदार यंत्रणेचे जाळे उभे करण्यासाठी मी कटिबद्ध आहे अशी ग्वाही ग्वाही राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. जिल्हा सामान्य रुग्णालयात 'आयुष्यमान भव' अभियानाचा जिल्हास्तरीय शुभारंभ झाला. या कार्यक्रमात ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी दूरदृष्यप्रणालीद्वारे संवाद साधला. तत्पूर्वी राष्ट्रीय स्तरावर देशाच्या महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आणि राज्यस्तरीय अभियानाचा शुभारंभ मा.



राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत करण्यात आला. जिल्हास्तरीय कार्यक्रमाला जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, परिविक्षाधीन आयएएस रणजीत यादव, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजकुमार गहलोत, अधिष्ठाता डॉ. मिलिंद फुलपाटील, राहुल पावडे, डॉ. मंगेश गुलवाडे, अंजली घोटेकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. 'आयुष्यमान भारत' ही जगातील सर्वात मोठी आरोग्य योजना पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी सुरू केली आहे, असे सांगून पालकमंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, 'या योजनेंतर्गत देशातील ५० कोटी नागरिकांना आरोग्याचे विमा कवच प्राप्त झाले आहे. तर राज्य सरकारने महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेत मोफत उपचाराची मर्यादा दीड लक्ष रुपयांवरून पाच लक्ष रुपये केली आहे. आरोग्य सेवेच्या बाबतीत चंद्रपूर जिल्हा उत्तमोत्तम राहावा, यासाठी आरोग्य यंत्रणेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ईश्वरीय सेवा म्हणून कार्य करावे. जिल्ह्यात अत्याधुनिक आरोग्य सुविधा, संसाधने, औषधे आदींसाठी एक रुपयाही कमी पडणार नाही.' 'इतर शासकीय विभाग भौतिकदृष्ट्या संपन्न असू शकतात, मात्र आरोग्य विभाग हा लोकांच्या सेवेसाठी आहे. त्यामुळेच जिल्ह्यात आता 'हॉस्पीटल ऑन व्हील' सुरू करण्याचे नियोजन आहे. आयुष्मान भारत कार्ड वाटप संदर्भात जिल्हाधिका-यांनी एक समिती गठीत करावी. याअंतर्गत कॉल सेंटर, आरोग्य विभागाच्या विविध योजनांची माहिती, नागरिकांमध्ये जनजागृती, आरोग्यमित्र आदींमध्ये चंद्रपूर अग्रेसर असावा. यासाठी इंडीयन मेडीकल असोसिएशन आणि सामाजिक संघटनांची मदत घ्यावी, अशा सुचनाही मुनगंटीवार यांनी केल्या.

**जिल्ह्यात आरोग्य यंत्रणेचे जाळे :** एम्सच्या धर्तीवर चंद्रपुरात नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तयार होत आहे. तसेच कॅन्सर हॉस्पीटलकरीता उद्योगपती रतन टाटा यांनी १०० कोटी रुपये दिले आहेत. सोबतच येथील कॅन्सर हॉस्पीटलला मदत करण्यासाठी नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सर हॉस्पीटलचे सहकार्य लाभत आहे. बल्लारपूर येथे कामगारांसाठी १०० खाटांचे अत्याधुनिक रुग्णालय तयार होत आहे. तसेच १०० खाटांचे स्त्री रुग्णालयसुध्दा लवकरच कार्यान्वित होणार आहे. जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र गुणवत्तापूर्वक व दर्जेदार व्हावे, यासाठी नियोजन समितीमधून निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. पोंभुर्णा येथील ग्रामीण रुग्णालय नागरिकांच्या सेवेत रुजू झाले असून मूल येथे ५ एकरमध्ये १०० खाटांचे सुसज्ज हॉस्पीटल उत्तम बांधण्याच्या सुचना दिल्या आहेत, असे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.

# खरगेंचा सरकारवर निशाणा

आधुनिक केसरी

संसदेच्या विशेष अधिवेशनाला सुरुवात झाली. अधिवेशन सुरु होण्याआधी पंतप्रधान मोदी यांनी माध्यमांशी संवाद साधला आणि त्यानंतर त्यांनी जुन्या संसद भवनात भाषण देखील केले. संसदेच्या विशेष अधिवेशनाच्या कामकाजावेळी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला. त्यांनी यावेळी बोलतांना म्हटलं की, 'सरकार मजबूत आणि विरोधी पक्ष कमकुवत बनवण्यासाठी ईडी आणि सीबीआयचा वापर केला जातो. पुढे बोलताना मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटले की, 'जर कोणत्या नेत्या भाजपमध्ये सामील करुन घेणार असतील तर त्याला वॉशिंग मशीनमध्ये टाकून आधी स्वच्छ केले जात.' तसेच खरगेंनी पंतप्रधान मोदींवर घणाघात करत म्हटलं की, 'पंतप्रधान मोदी संसदेत कधीतरी येतात आणि त्यांच्या येण्याचा देखील कार्यक्रम केला जातो. मल्लिकार्जुन खरगे यांनी यावेळी मणिपूरच्या मुद्द्यावर देखील भाष्य केलं. 'मणिपूरमध्ये हिंसा अजूनही सुरुच आहे. 3 मे पासून मणिपूरमध्ये हिंसेचे सत्र सुरुच आहे. तिथे लोकांचा जीव जातो, घरे जाळली जातायत. आज देखील एकाने आपला जीव गमावला. याविषयी चर्चा व्हायला हवी आणि पंतप्रधान मोदींनी देखील यावर स्पष्टीकरण द्यायला हवे. पंतप्रधान मोदी देशातील प्रत्येक भागात जातात.' मग ते आता मणिपूरमध्ये का जात नाही असा सवाल देखील खरगेंनी यावेळी संसदेत उपस्थित केला. तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी आपल्या कार्यकाळात 21 वेळा निवेदन दिले. तर मनमोहन सिंह यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये 30 वेळा निवदेन दिले. पण पंतप्रधान मोदी यांचे प्रचलित विधान बाजूला ठेवले तर त्यांनी नऊ वर्षांच्या कलावधीमध्ये फक्त दोनदाच निवेदन दिले आहे', असे काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी संसदेला सांगितले. संविधान निर्मात्यांनी आपल्याला जे संविधान दिले, त्यामुळे आपल्याला एकजूटीने राहण्याचा संदेश दिला आहे. भारतीय संविधान आपल्यासाठी खूप मोठा मार्गदर्शक आहे. त्याच्याचमुळे आपल्याला मतदानाचा अधिकार दिला. यामुळे गरीब आणि श्रीमंत असा भेदभाव न करता सर्वांना मतदानाचा समान अधिकार दिला. पण हेच संविधान बदलण्याचा प्रयत्न आता केला जात आहे, जे अत्यंत गंभीर असल्याचे खरगे यांनी म्हटले आहे.



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

# शैक्षणिक संस्थांनी शिक्षणच द्यावे !

आधुनिक केसरी

**भारतात लोकांची मानसिकता व धर्मांधता एवढी वाढली आहे की येथे सत्य बोलले तर धर्मविरोधी म्हणून त्याचा द्वेषच केला जात नाही तर दाभोळकर, पानसरे, कलबुर्गी, गौरी लंकेश अशा विद्यानवादी लोकांची हत्या केली जाते. बंदुकीच्या गोळीपेक्षा लेखणीची भिती आजही आहे. विषमतावादी व अंधविश्वासाची व्यवस्था टिकवून राहण्यासाठी अनेक विषमतावादी लोक ज्यांना विषमतेच्या व धर्माच्या आडून आपले पोट भरायचे आहे असे लोक नेहमीच लोकांच्या डोक्यात अज्ञान पेरून त्यांना भावनिक बनवून त्याला धर्माचे वलय देऊन माणसिक गुलाम बनवले जाते. आणि याच माणसिक गुलाम लोकांचा फायदा अंधविश्वास, पाखंड, भोंदुगीरी पसरवून स्वतः चे दुकान चालावे म्हणून धर्माचे दुकानदार लोकांना जागृत होऊ देत नाहीत.**

धर्माचे दुकानदार लोकांना हक्क अधिकार यांच्या विषयी जागृत होऊ देत नाहीत, शिक्षणाचे महत्त्व न सांगता काल्पनिक बाबी डोक्यात टाकुन लोकांना अज्ञानातच ठेवले जाते. शिवाय अशाच लोकांकडून सामाजिक द्वेष व अशांतता निर्माण होईल अशा प्रकारचे कृत्य केले जाते. देशातील सामाजिक व राजकीय परिस्थिती भावनिक व धार्मिक बनत असताना यावर एकच उपाय आहे तो म्हणजे शिक्षण. शिक्षणाने लोक जागृत होऊन हक्क अधिकाराची मागणी करून सत्तेतील वाटा मागत असतात. सामाजिक समस्येवर आवाज उठवून सरकारला प्रश्न विचारत असतात. परंतु मागील काही वर्षांपासून शैक्षणिक संस्था अंधविश्वास व पाखंड याला महत्त्व देऊन वादाचे मुद्दे निर्माण करत आहेत. शैक्षणिक संस्थांनी निरपेक्ष राहुन विद्यार्थ्यांना शिक्षण देऊन विद्यानवादी, तर्कवादी व प्रयत्नवादी बनवण्या ऐवजी अंधविश्वासामध्ये ढकलून दिले जात आहे आणि शैक्षणिक संस्था ही धर्म निरपेक्ष असताना तेथे धार्मिक वातावरण निर्माण करून धर्मामध्ये भेद करण्याचे काम सुरू केले आहे. मुळात शैक्षणिक संस्थानी फक्त धर्मनिरपेक्ष राहुन योग्य ते शिक्षण देऊन भविष्यासाठी वैद्यानिक, कुशल अधिकारी व जागृत नागरिक बनवणे आवश्यक असताना ही केवळ काही धार्मिक कार्यक्रम शाळेमध्ये साजरे करून शैक्षणिक संस्थेला धार्मिक संस्था बनवण्याचे काम सुरू आहे. आपापला धर्म प्रत्येकाला प्रिय असतो. काही काही लोक तर धर्म वेडे असतात. धर्माच्या नावाखाली किती ही चुकिच्या गोष्टी ते स्विकारतात व आपल्या धर्मातील इतरही लोकांवर त्या बंधनकारक करतात. परंतु शैक्षणिक शिक्षण संस्थेमध्ये सध्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता पुर्ण शिक्षणाच्या माध्यमातून वैज्ञानिक दृष्टिकोन देणे हे शिक्षण संस्थेचे काम असते. परंतु शिक्षण संस्थाच जर एकाच धर्माला महत्त्व देऊन एकाच धर्मातील अंधविश्वासाला पुरक व वाद निर्माण होतील अशा बाबी साजऱ्या करत असतील तर त्यांना शिक्षण संस्था म्हणायचे का? जसे मागच्याच आठवड्यात अनेक शाळांमध्ये दहीहंडी कार्यक्रम साजरा केला गेला. या कार्यक्रमासाठी अनेक शैक्षणिक संस्थांनी आपल्याच विद्यार्थ्यांपार्फत दहिहंडी साठी लागणारे लहान मोठे साहित्य गोळा करून तो कार्यक्रम शैक्षणिक संस्थेत साजरा केला गेला. शैक्षणिक संस्थेमध्ये वेगवेगळ्या जाती धर्माचे विद्यार्थी असतात. परंतु ते सर्व एकत्र फक्त आणि फक्त शिक्षण या मुद्यांवर आलेले असतात. सर्व धर्माचे लहान विद्यार्थी एकत्र आल्यानंतर एकाच धर्माला महत्त्व देऊन तो धार्मिक कार्यक्रम शैक्षणिक संस्थेत साजरा होत असेल तर त्या लहान मनावर काय परिणाम होईल याचा विचार पालकवर्ग व शैक्षणिक संस्था चालक आणि ज्यांनी योग्य मार्ग दाखवावा अशा शिक्षकांनी कधी केला का? आता गणेशोत्सव सुरू होत आहे. गणेशोत्सव साजरा करण्यासाठी अनेक शैक्षणिक संस्था सज्ज झाल्या आहेत. लहान लहान विद्यार्थ्यांच्या पालकांना गणेशोत्सव करायचा म्हणून वर्गणी देखील मागितली जात आहे. गणेशोत्सव हा धार्मिक उत्सव शैक्षणिक संस्थेमध्ये साजरा करणे कितपत योग्य आहे? बर दहीहंडी, गणेशोत्सव सारखे धार्मिक उत्सव साजरे करून विद्यार्थ्यांच्या कोवळ्या मनावर शिक्षक लोक नेमके काय बिंबवणार आहेत? धर्माचे पालन, उपासना करण्याचा अधिकार सर्वांना भारतीय संविधानाने दिलेला आहे. परंतु तो शासकीय पातळीवर नाही तर वैयक्तिक पातळीवर करू शकतो. ज्यांना गणेशोत्सव साजरा करायचा त्यांनी खुशाल आपापल्या घरी चौका चौका चौकात खुशाल साजरा करावा. परंतु शैक्षणिक संस्था हे एकाच धर्माचे धार्मिक कार्य, उपासना करण्याचे ठिकाणी मुळीच नाही. शैक्षणिक संस्थेमध्ये वेगवेगळ्या जाती धर्मातील विद्यार्थी भारतीय म्हणून शिक्षण घेण्यासाठी येतात तेथे त्यांना शिक्षणच मिळणे आवश्यक असते. एकाच धर्माचे सन उत्सव साजरे करून शैक्षणिक संस्था चालक व शिक्षक यांनी धार्मिक भेद करू नये. जर शैक्षणिक संस्थेमध्ये धार्मिक सन उत्सव साजरे करता तर सर्वच धर्माचे करायला पाहिजे. मग ज्या शिक्षण संस्था दहिहंडी, गणेशोत्सव साजरा करतात त्या संस्था ईदच्या दिवशी नमाज पठण करणार का? दुसरी गोष्ट म्हणजे दहिहंडी कृष्ण व गणेशोत्सव गणपती हे दोन्हीही बौद्ध धम्म नाकारतो.

मग दहीहंडी व गणेशोत्सव शैक्षणिक साजरा करताना हा त्या धम्माचा अवमान नाही का? म्हणजे एका धर्माला महत्त्व देताना दुसऱ्या धर्माला, त्यांच्या विचार सरणीला न जुमानने हे धर्मनिरपेक्ष चे लक्षण आहे का? अशा मुद्यावर बोलल्या नंतर धर्मांध लोक तर चिडून उठतात परंतु ज्यांना सुशिक्षित व समजदार समजले जाते असेही लोक स्वतः च्या धर्मा बद्दल सत्य गोष्टी ऐकायला तयार न होता सत्य बोलणाऱ्याच्या विरोधात उभे राहतात. शैक्षणिक संस्थेमध्ये एकाच धर्माचे आणि अंधविश्वासाला पुरक असे सन साजरे करताना इतर धर्माचा अवमान केला जातो, आणि यावर कोणी बोलले तर वाद निर्माण होतो हे माहीत असूनही जाणीव पुर्वक हे कृत्य करण्या मागचा उद्देश काय? हे कृत्य करणे म्हणजे जाणीव पुर्वक आपला धर्मातील चुकिच्या चालीरीती आणि अंधविश्वास इतरांवर लादणे नव्हे का? इतर धर्मातील विचार व सन उत्सव साजरे करणे जमत नसेल तर दहिहंडी, गणेशोत्सव साजरे करून द्वेष, विषमता निर्माण होईल असे वातावरण का निर्माण केले जाते. राष्ट्रीय महोत्सव जसे स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन हे ही एवढ्या आनंदी तिव्रतेने साजरे केले जात नाहीत एवढ्या आपुलकी ने हे धार्मिक कार्यक्रम केले जातात. राष्ट्रीय महोत्सव असल्यावर ध्वजारोहण करून घरी जाण्याची घाई असलेल्या शिक्षकांना दहीहंडी आणि गणेशोत्सव साजरा करायला वेळ कसा मिळतो? राष्ट्रभावना, एकी, माणुसकी व माणूस,. बंधुभाव लहान मुलांच्या मनात रूजवण्याच्या वयात जर अंधविश्वास आणि एखाच धर्माबद्दल चा उदोउदो शैक्षणिक संस्था रुजवत असेल तर तेथे गुणवत्ता व आदर्श विद्यार्थी निर्माण कसे होतील. जागतिक शैक्षणिक श्रेणी मध्ये आपण पहिल्या दहा मध्ये नाही ही प्रत्येकासाठी लाजीरवाणी बाब आहे. लोकसंख्या सर्वात जास्त असलेल्या आणि विश्वगुरू बनण्याचे स्वप्न बघणारा देश शैक्षणिक दृष्टीने मागासलेला असेल तर जागतिक पातळीवर विश्वगुरू काय पण आपल्याला कोणी लायकही समजणार नाही. याची जाणीव प्रत्येक भारतीय नागरिकांना असायला पाहिजे. धार्मिक कार्यक्रम हे शैक्षणिक संस्थेमध्ये साजरे न करता महापुरुषांचे जयंती कार्यक्रम साजरे करून महापुरूषांनी अंधविश्वास, पाखंड, भोंदुगीरी, विषमता कशी मातीत गाडली व समता बंधुता न्याय व स्वातंत्र्य बहाल करून माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला हे विद्यार्थ्यांना पटवून देणे आवश्यक आहे. गणेशोत्सव सार्वजनिक माणुन महापुरूषांना जातीत वाटून त्यांचे विचार व कार्य न वाचणाऱ्या आणि स्वतः शिक्षण घेऊनही महापुरूषांना जातीत बंद करून त्यांचा तिरस्कार करणाऱ्या लोकांच्या मेंदूची किव येते. शिक्षण महात्मा फुले यांनी सुरू करून दिले, आरक्षण शाहु महाराज यांनी दिले, हक्क अधिकार आणि आरक्षणाला व शिक्षणाला संरक्षण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिले, आणि हिंदु महिलांच्या माना सन्मानासाठी, हक्क अधिकारासाठी मंत्री पदाचा राजीनामा दिला तरीही ह्या महापुरूषांचे कार्य व विचार समजले नसतील तर आपण बौध्दिक दृष्टीने मागासलेले आहोत हेच सिद्ध होते. सर्वत्र जातीधर्माच्या नावाखाली लोकांमध्ये द्वेष पसरवण्याचे काम सुरू असताना शिक्षकाने भारतीय संविधान समजावून सांगुन भारतीय म्हणून बंधुतेच्या दोरीने बांधायचे काम करणे अपेक्षित असूनही शिक्षक वर्गच जर धर्माच्या आडून अंधविश्वासाला खतपाणी घालत असतील आणि एकाच धर्माकडे झुकत असतील तर शिक्षणाचा काहीच फायदा झाला नाही असे दिसुन येते. मग ज्या शिक्षकांनाच शिक्षणाचे महत्त्व कळाले नसेल तर ते शिक्षक विद्यार्थ्यांना काय शिक्षण देणार हा मोठा प्रश्न आहे. पगार मिळतो म्हणून हजेरी लावायची याच उद्देशाने शिक्षक शाळेवर जात असतील तर विद्यार्थ्यांची माती झाली म्हणून समजायचे. अर्थात सर्वच शिक्षक किंवा शैक्षणिक संस्था असे करत नाहीत परंतु जे करतात त्यांच्या बद्दल हे बोलत नाहीत हे त्याहूनही घातक आहे. शिक्षक आणि शैक्षणिक संस्था देशासाठी आदर्श व प्रभावशाली संपत्ती निर्माण करत असतात. म्हणून शैक्षणिक संस्थेमध्ये कोणत्याही धार्मिक कार्यक्रमाला महत्त्व न देता. देश, संविधान, राष्ट्रीय प्रतिके, राष्ट्रीय संपत्ती, बंधुता व एकात्मता या बाबींवर ही विद्यार्थ्यांना घडवणे आवश्यक असते. आणि हे सर्व करायचे तर शैक्षणिक संस्थानी शिक्षणच द्यायला पाहिजे. धार्मिक कार्यक्रम केले तर वाद आणि प्रश्न निर्माण होऊन वातावरण दुषीत होत असते. म्हणून शैक्षणिक संस्था व शिक्षकांनी समजदारी व सत्य परिस्थिती बघून शैक्षणिक संस्थेत फक्त शिक्षणच द्यायला हवे. धार्मिक कार्यक्रम तर ज्यांना वाटेल ते घरी करतील त्याची काळजी शैक्षणिक संस्थेने करू नये.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# भारतच आशियाचा राजा

आधुनिक केसरी

**रविवारी कोलंबोत झालेल्या आशिया चषकाच्या अंतिम सामन्यात भारताने यजमान श्रीलंकेचा दहा विकेट्सने धुव्वा उडवत आशिया चषकावर विक्रमी आठव्यांदा नाव कोरत इतिहास घडवला. अंतिम सामन्यात भारताच्या वेगवान गोलंदाजांनी त्यातही मोहम्मद सिराजने आपल्या कारकिर्दीतील सर्वोत्तम गोलंदाजी करत श्रीलंकेच्या फलंदाजांची पळता भुई थोडी केली. मोहम्मद सिराजने अंतिम सामन्यात भेदक गोलंदाजी करताना अवघ्या २१ धावात सहा बळी मिळवले.**

विशेष म्हणजे त्याने एकाच षटकात श्रीलंकेचे चार फलंदाज बाद केले. अशी कामगिरी करणारा तो पहिला भारतीय गोलंदाज ठरला त्याला हार्दिक पांड्या आणि जसप्रीत बुमरा यांनी चांगली साथ दिली. हार्दिकने तीन तर बुमराने १ बळी मिळवत श्रीलंकेला अवघ्या ५० धावात रोखले. भारतच्या सलामीच्या जोडीने अवघ्या ६.१ षटकात हे लक्ष पार करून आशिया चषकावर मोहोर उमटवत आपणच आशियाचा राजा आहोत हे सिद्ध केले. या सामन्याचा मानकरी ठरलेल्या वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजने आपल्याला मिळालेल्या सामन्याचा मानकरी पुरस्काराची रक्कम ग्राऊंडसमनला देऊन प्रेक्षकांची मने जिंकली. आपण फक्त चांगला गोलंदाजच नसून चांगला माणूसही आहे हे त्याने आपल्या कृतीतून दाखवून दिले. त्याच्या या कृतीतून तो त्याचे पाय आजही जमिनीवर आहेत हे त्याने दाखवून दिले आहे. भारताने या स्पर्धेत अप्रतिम कामगिरी केली. गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाड्यांवर भारतीय खेळाडूंनी चांगली कामगिरी केली. भारताच्या सर्वच खेळाडूंनी चांगली कामगीरी करून आपण फॉर्मात असल्याचे दाखवून दिले. रोहित शर्मा, शुभमन गिल, विराट कोहली, के एल राहुल, ईशान किशन या भारताच्या सर्वच फलंदाजांनी अप्रतिम कामगिरी केली. गिल, कोहली आणि राहुल यांनी तर शतके झळकावली. रोहितने काही अर्धशतकी खेळी करत संघाला चांगली सुरवात दिली शिवाय त्याने संघाचे अप्रतिम नेतृत्व केले. गोलंदाजीतही बुमराह, शमी, सिराज, जडेजा आणि कुलदीप यादव यांनी चांगली कामगिरी केली. हार्दिक पंड्याने दमदार अष्टपैलू कामगिरी केली. कुलदीप यादव तर या स्पर्धेत भारताचा ट्रम्पकार्ड बनला होता त्याची फिरकी प्रतिस्पर्धी संघातील कोणत्याच फलंदाजाला समजली नाही. विश्वचषकात तर तो भारताचा एक्स फॅक्टर ठरणार आहे. ही स्पर्धा भारतीय संघासाठी खूप महत्वाची आहे हे मी माझ्या आशिया चषक ; विश्वचषकाची रंगीत तालीम या लेखात नमूद केले आहे. ज्याप्रमाणे मुख्य परिक्षेपूर्वी पूर्व परीक्षा असते ही पूर्वपरीक्षा म्हणजे मुख्य परीक्षेची रंगीत तालीम असते. मुख्य परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची किती तयारी झाली हे पूर्व परीक्षेद्वारे जोखता येते. आशिया चषकही भारतासाठी विश्वचशकाची पूर्वपरीक्षा होती आणि या पूर्व परीक्षेत पैकीच्या पैकी गुण मिळवून भारताने आपण विश्वचशकासाठी तयार असल्याचे जगाला दाखवून दिले आहे. पुढील महिन्यात पाच तारखेपासून विश्वचषकाला प्रारंभ होणार आहे. मागील बारा वर्षांपासून भारताने ही स्पर्धा जिंकली नाही आता आशिया चषक जिंकल्याने भारतच विश्वचषक जिंकणार याची खात्री देशातील १४० कोटी जनतेला पटली आहे. भारतीय संघानेही आशिया चषकावर



नाव कोरत आपण आशियाचा राजा आहोत हे सिद्ध करून आता जग जिंकण्यास तयार असल्याचे दाखवून दिले आहे. आज आशिया जिंकला उद्या अवघे विश्व ताब्यात घेण्याकडे कूच करणाऱ्या भारतीय संघाचे मनापासून अभिनंदन आणि संघाला विश्वचषकासाठी शुभेच्छा!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# मराठ्यांच्या ओबीसीकरणाचा महामोर्चात तीव्र विरोध

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** संपूर्ण राज्यात सुरु असलेल्या मराठा आरक्षणाच्या मागणीची ठिणगी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात पडलेली असून जालना येथे मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला सरसकट कुणबी समाजात शामिल करावे अशी मागणी केलेली आहे. जरांगे पाटलांनी केलेल्या सरसकट मराठा समजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन त्यांचे ओबीसीकरण करण्याच्या मागणीला राष्ट्रीय ओबीसी महासंघाचा तीव्र विरोध आहे. या संबंधात राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या संपन्न झालेल्या सभेत सदर मागणीचा तीव्र निषेध करण्यात आला आहे.राष्ट्रीय ओबीसी महासंघ व ओबीसी संघटनाच्या कडून चंद्रपूर येथे गांधी चौकातून महामोर्चाचे यशस्वी आयोजन करण्यात आले, यात चंद्रपूर सहीत लगतच्या यवतमाळ, वर्धा, गडचिरोली जिल्ह्यातून मोठया प्रमाणात ओबीसी बांधवानी आपला आक्रोश व्यक्त केला.

ओबीसीच्या मागण्या राज्य सरकारनी त्वरित पूर्ण कराव्यात. यात प्रामुख्याने कुठल्याही परिस्थितीत सरसकट मराठा जात लिहिलेल्या मराठा समाजातील व्यक्तींना कुणबीजातीचे प्रमाणपत्र देऊन त्यांचे ओबीसीकरण करण्यात येवू नये. बिहार राज्याच्या धरतीवर महाराष्ट्र राज्यात ओबीसींची जातनिहाय सर्वे करण्यात यावी. संपूर्ण



देशात ओबीसींची जातनिहाय जनगणना करण्याची शिफारस महाराष्ट्र शासनाने केंद्रसरकार कडे करावी. कुठल्याही परिस्थितीत मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात आरक्षण देण्यात येऊ नये. ५२% ओबीसी समाजाला ५२% आरक्षण देण्यात यावे. मा. सर्वोच्च न्यायालयाने लादलेली ५०% आरक्षणाची मर्यादा रद्द करण्याची शिफारस महाराष्ट्र शासनाने केंद्रसरकारकडे करावी. महाराष्ट्र राज्यात ओबीसी समाजाच्या विद्यार्थ्यासाठी मंजूर केलेली ७२ वसतिगृहे त्वरित भाड्याच्या इमारतीत सुरु करावी.ओबीसी समाजातील ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळणार नाही त्यांच्याकरीता स्वाधार योजना त्वरित लागू करावी.ओबीसी विद्यार्थ्यासाठी अभ्यासक्रमात त्वरित शिष्यवृत्ती व फ्रीशिप योजना त्वरित लागू कराव्या. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम ( CMEGP ) योजनेत इतर मागासवर्गीय प्रवर्गाचा (OBC) समावेश करण्याबाबत. नॉन क्रीमिलीयर प्रमाणपत्र व (२) 8 लाख रू. उत्पन्नाची अट अशा दोन अटीपैकी 8 लाख रू. उत्पन्नाची अट रद्द करून फक्त नॉन क्रीमिलेयर प्रमाणपत्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना वरील योजनेचा लाभ देण्याचा शासन निर्णय निर्गमीत करण्यात यावा. म्हाडा व सिडको योजने अंतर्गत ओबीसी समाजास आरक्षण लागू करण्यात यावे याचे निवेदन जिल्हाधिकारी चंद्रपूर मार्फत राज्यपाल,मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री, पालकमंत्री,चंद्रपूर, मुख्य सचिव, प्रधान सचिव इतर मागास बहुजन कल्याण विभाग, अध्यक्ष मागासवर्गीय आयोग, पुणे यांना या महामोर्च्याच्या ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय सचिव सचिन राजूरकर, ऍड. पुरुषोत्तम सातपुते, ऍड. विजय मोगरे, राजेश बेले दिनेश चोखारे, सूर्यकांत खनके, डॉ. संजय घाटे, डॉ. दिलीप कामडे, विलास माथाणकर श्याम लेडे, कुसुम उदार, अनिल डहाके,कुणाल चहारे,गणेश आवारी, मनीषा बोबडे, गोमती पाचभाई,अनिल शिंदे, देवा पाचभाई,प्रेमा जोगी अक्षय येरगुडे हितेश लोडे यांच्या मार्फत चंद्रपूर उपविभागीय अधिकारी मृगूनाथन यांनी स्वीकारले. उपरोक्त मागण्या पूर्ण करण्याकरीता राष्ट्रीय ओबीसी विद्यर्थी महासंघाचे चंद्रपूर जिल्हाध्यक्ष श्री. रवींद्र टोंगे चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दिनांक 11सप्टेंबर पासून अन्नत्याग आंदोलन करत आहेत.या आंदोलनास ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव तयावाडे यांनी समारोपिय भाषणात निवेदनात दिलेल्या मागण्या मंजूर झाल्या नाही तर या पेक्षा मोठे आंदोलन संपूर्ण महाराष्ट्रात करण्यात येईल असा इशारा दिला.

विरोधी पक्षनेते विजय वड्डेटीवार माजी, माजी मंत्री परिणय फुके आमदार अभिजित वंजारी, आ. किशोर जोरगेवार, आ. प्रतिभा धानोरकर,अशोकभाऊ जिवतोडे,माजी आमदार देवराव भांडेकर,माजी आमदार आशिष देशमुख, माजी आ. सुदर्शन निमकर,नंदू नागरकर, पप्पू देशमुख, महेंद्र ब्राम्हणवाडे, देवराव भोंगडे, सतीश वारजूरकर, संध्याताई गुरनुले, रवींद्र शिंदे, राजेंद्र वैद्य, सलील देशमुख,रमेश राजूरकर,अनिल धानोरकर, किशोर टोंगे, संदीप गिऱ्हे, नितीन भटारकर, प्रशांत वाघरे, अविनाश पाल, गंगाधर वैद्य, गोविंदा पोडे, संदीप आवारी, बळीराज धोटे, विश्वास झाडे, राजू झोडे,अभिलाष गावतुरे, डॉ. गावतुरे, प्रवीण खोब्रागडे, सुनील मुसळे राजेंद्र खोब्रागडे,प्रतीक डोर्लिकर, निलेश बेलखेडे, नंदू पढाल,दत्ता हजारें, वासुदेव खेळकर,डॉ. महाकुळकर, गोवील मेहेरकुरे, विजय नळे, विजय पिदूरकर, रंजित डवरे डॉ. पियुष मेश्राम, ऋषभ राऊत, निलेश खोडे, आदिवासी समाजाचे प्रमोद बोरीकर, कृष्णा मसराम ,पराग वानखेडे,आदी विविध पक्षाचे तथा विविध जातनिहाय संघटना कुणबी, तेली, माळी, सुतार, नाभिक, बारई, सोनार, कलार,धनगर, बेलदार, भावसार, शिंपी, परीट, लोहार, वाढई समाज संघटना सोबतच आरपिआय संघटनेचे समर्थक उपस्थित होते.

## आरक्षणासाठी खंडाळ्यात एकवटला धनगर समाज

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** धनगर समाजास अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात यावी.या मागणीसाठी राज्यभर धनगर समाज बांधवांकडून आंदोलन केले जात आहे.चौंडी येथे धनगर समाज बांधव हे आमरण उपोषणास बसलेले असून उपोषणास पाठींबा दर्शविण्यासाठी खंडाळ्यातील धनगर समाज हा एकवटलेला आहे.

दिनांक २० सप्टेंबर रोजी सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने आंदोलन करण्यात येणार आहे.या आंदोलनाविषयी खंडाळ्याच्या तहसील कार्यालयात बैठक संपन्न होत असताना याबाबतची विस्तृतपणे माहिती सकल धनगर समाज बांधव यांच्या वतीने प्रशासकीय अधिकारी व पोलीस अधिकारी यांना देण्यात आली. यावेळी ऋषिकेश धायगुडे, रमेश धायगुडे,पवन धायगुडे अजय धायगुडे, अशोकराव धायगुडे, ज्ञानेश्वर धायगुडे, जिजाबा काळे, हेमंत वळकुंदे, बाळासाहेब शेळके पाटील, लक्ष्मणराव शेंडगे, स्वप्निल धायगुडे, कुंडलिक ठोंबरे, दादासो तालवर, विकास धायगुडे, गणेश वळकुंदे,सतीश धायगुडे, दादासो शेळके,गणेश कचरे,नानासो हाके,सुरज धायगुडे, कृष्णा बरकडे, रंगनाथ शेळके इत्यादीसह सकल धनगर समाज बांधव उपस्थित होते. दि.२० सप्टेंबर रोजी कशाप्रकारे आंदोलन करणार आहेत.याबाबतची माहिती धनगर समाज बांधवांकडून देण्यात आली.खंडाळा येथून जात असलेल्या राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको करण्यात येणार आहे.

प्रशासनाने धनगर समाज भावना ओळखून आंदोलन करण्यास परवानगी दिली आहे.दि.२० सप्टेंबर रोजी सकाळी ११ वा.डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मोर्चा खंडाळा शहरातुन राष्ट्रीय महामार्गाकडे प्रस्थान होणार असून यावेळी महामार्गावरील दोन्ही बाजूकडील मार्ग अडवुन आंदोलन सुरू करण्यात येणार आहे.आंदोलनातून कोणतेही गालबोट लागणार नाही असे आश्वासन देण्यात आलेले असून प्रशासनाला पूर्णपणे सहकार्य केले जाईल, असे धनगर समाज बांधवांनी म्हटले.

## कंत्राटी भरतीविरोधात आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शासन सेवेत सध्या कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित करण्याची मागणी करत कंत्राटी पद्धतीने अधिकारी, कर्मचारी भरतीच्या शासन निर्णयाविरोधात येथे राष्ट्रवादी युवक काँग्रेसने आंदोलन केले. रणजीतराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी शिष्ठमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या निर्णयाचा आदेश जाळून होळी करण्यात आली. राज्य सरकारने सहा सप्टेंबर रोजी काढलेल्या निर्णयात बाह्य यंत्रणेमार्फत मनुष्यबळ उपलब्ध करून कंत्राटी पद्धतीने अधिकारी, कर्मचारी भरती करण्याचा निर्णय घेऊन तसे आदेश दिले असल्याचे निवेदनात म्हटले आहे. यानुसार शिक्षक, अभियंता, ग्रामसेवक, लिपिक, वरिष्ठ सहायक, तांत्रिक अधिकारी, शिपाई, चालक आदी पदेही कंत्राटी पद्धतीने बाह्य यंत्रणेमार्फत भरले जातील.

## बाजारसावंगी येथे मराठवाडा मुक्ती संग्रामदिन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथे व परिसरात सर्कलमध्ये ठिकठिकाणी मराठवाडा मुक्ती संग्रामदिन निमित्त फेरी, घोषणा, सर्वत्र ध्वजारोहण करत मुक्ती दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

येथील ग्रामपंचायतचे ध्वजारोहण सरपंच आप्पाराव पाटील नलावडे यांच्या हस्ते करण्यात आले. पोलीसचौकीची ध्वजारोहण मुख्य जमादार नवनाथ कोल्हे, सोसायटीचे ध्वजारोहण संचालक श्रीयुत राऊत, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे ध्वजारोहण व्यवस्थापक, जिल्हा परिषद केंद्रीय शाळेचे ध्वजारोहण शाव्यस अध्यक्ष रमेश नलावडे, जिल्हा परिषद प्रशाळेचे ध्वजारोहण मुख्याध्यापक हरिभाऊ दहीफळे यांच्या हस्ते करण्यात आले. सह्याद्री इंग्लिश स्कूलचे ध्वजारोहण मुख्याध्यापक योगेश कुचे, रायझिंग स्टार इंग्लिश स्कूल चे ध्वजारोहण संस्थापक संचालक श्रीयुत नलावडे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी जेष्ठ समाजसेवक पुंजाजी अण्णा, माजी सरपंच भिमराव नलावडे, उपसरपंच कारभारी नलावडे, ग्रापंस पोपट काटकर, अरुण गायकवाड, गायकवाड, चेअरमन किशोर नलावडे, गणपत पाटील, सय्यद टेलर, चांद पठाण,नामदेव नलावडे, विनोद नलावडे, जनार्दन औटे, भिकन घुले, ज्ञानेश्वर टेलर, शिवाजी काटकर, आनंदा काटकर, अंबादास नाना, शंकर नलावडे,सखाहरी महाराज,ग्राविअ एबी बनसोड, सचिव जाधव, आजी माजी सरपंच ग्रामपंचायत सदस्य, आजी माजी सोसायटी चेअरमन संचालक, व्यापारी,नौकरदार, पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, पोलिस, पत्रकार, अंगणवाडी सेविका, मदतनीस, नागरिक विद्यार्थी उपस्थित होते.




महाराष्ट्र Business Katta












# पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करू या



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**गणेशोत्सव हा मुळात जनतेने एकत्रित येऊन संघटन शक्तीचा सामाजिक, राजकीय धार्मिक क्षेत्रात प्रगती व गती देण्यासाठी साजरा करणार सण आहे, कालमानानुसार या सणाची व्याप्ती वाढत गेली व या सार्वजनिक गणेशोत्सवाला धंद्याचे स्वरूप प्राप्त झाले, पूर्वी घरी मूर्ती बनवत असे, मुर्तीकार मंडळीही अतोनात कष्ट करून मूर्त्यांना देवत्व प्राप्त करून देत असत,पण आत्ता पर्यवारणाकडे सर्रास दुर्लक्ष करून गणेशोत्सवाला वेगळेच वळण लागले आहे. थर्माकोल, विविध केमिकल असलेले रंग, नष्ट न होणारे प्लास्टिकच्या वस्तू, यामुळे सजावट जरी चांगली दिसत असली तरी या पर्यावरण विरोधी वस्तूंच्या वापरामुळे, प्रदूषण वाढून सामान्य जनतेच्या आरोग्याचा प्रश्न वाढिस लागला आहे.**

तसेच या सजावटीच्या साहित्याच्या किंमतीही महाग झाल्यामुळे सामान्य व्यक्तींनी हा सण साजरा करणे अवघड झाले आहे, या साठी पर्याय आहे का तर निश्चितच पर्याय आहे, जर आपण साध्या किंवा शाडू मातीच्या मूर्तींना घरी किंवा कार्यशाळेत बनवून घेतले व त्यांना घरच्या वापरातील वस्तूंचा सजावटी साठी उपयोग केला तर घरातील वातावरण पण प्रसन्न राहील. गणेशो त्सवाचा खर्च पण कमी येईल व पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा आनंद उपभोगता येईल  हळू हळू सार्वजनिक गणेशोत्सव कमी व्हावेत व घरगुती गणेशउत्सवाला प्राधान्य मिळावे असे वाटते, त्या मुले आज जे गणेशोत्सव चे चित्र , दिसते ते कमी होण्यास मदत होईल आज सार्वजनिक गणेशोत्सवामुळे, वाहतुकीचा ताण वाढतो आहे, ध्वनिप्रदूषण, हवेचे प्रदूषण वाढते आहे, रस्ते खडेमयय झालेले दिसतात, वर्गणी वर लोक नाराज झाले दिसतात, अतिक्रमणवाढून सामान्य जनतेस त्रास होतो आहे, नदीचे प्रदूषण वाढण्यास मदत होत आहे, गर्दीमुळे अनेक आजारांना आमंत्रण मिळते हे सर्व टळेल. सण करताना उत्सावातून प्रदूषण होणार नाही याची खबरदारी प्रत्येकाने घ्यायला हवी. सध्या सर्वत्र पर्यावरण भाषामुळे विविध प्रकारच्या समस्यांचा डोंगर उभा आहे. हवा, पाणी, ध्वनी आणि जमिनीचे प्रदूषण  वाढतच आहे त्यामुळे वाढत्या प्रदूषणामध्ये आणखीन भर नको म्हणून येथून पुढच्या काळामध्ये प्रत्येक सण उत्सव व परंपरा साजरे करताना पर्यावरण रक्षणाचा विचार करायला हवा. पर्यावरण पूरक गणेश उत्सव साजरा करण्यासाठी आपण काय करू शकतो व आपण स्वतः पर्यावरणपूरक गणेश उत्सव साजरा करण्यासाठी काय मदत करू शकतो हेही प्रत्येकाने पाहिले पाहिजे. ध्वनी प्रदूषण हवा प्रदूषण पाणी प्रदूषण कमी करण्यास हातभार लावू शकतो. गणेश उत्सव काळामध्ये मोठ्या प्रमाणात



लाऊड स्पीकर  जातात त्यामुळे ध्वनी प्रदूषण होते. त्यामुळे कमी आवाजात स्पीकर लावणे गरजेचे आहे. आतशबाजीमुळे फटाक्यातून हवा प्रदूषण होते. त्यामुळे फटाके मुक्त गणेश उत्सव साजरा करणे आवश्यक ठरते.

गणपतीचे विसर्जन करताना नदीमध्ये किंवा तलावांमध्ये न करता मूर्ती दान करून पर्यावरण रक्षा साठी मदत करू शकतो. गणेशोत्सवासाठी जंगलातील विविध प्रकारची पाने फुले फळे व वनस्पती यांचा वापर पूजा व सजावटी  केला जातो. त्यामुळे निसर्गातील दुर्मिळ वनस्पती नष्ट होण्यास धोका निर्माण होतो. म्हणून गणेशोत्सव शेतामध्ये किंवा परसबागेमध्ये पिकवल्या जाणाऱ्या बागायती फुलांचा व फळांचा वापर करून पर्यावरण पूरक सण साजरा करण्यास हातभार लावणे गरजेचे आहे त्यामुळे जैवविविधतेचे जतन करण्यास मदत होईल. गणेशोत्सव  काळामध्ये प्लास्टिकचा वापर मोठ्या प्रमाणात होत असतो तो वापर कमी करणे महत्त्वाचे आहे. निर्माल्य हे निर्माण कुंडामध्येच टाकून पर्यावरण आणि रोखू शकतो  एक गाव एक गणपती या अभिनव प्रयोग आपण  नोंदवू शकतो. अशाप्रकारे पर्यावरण पूरक गणेश उत्सव साजरा केला तर हा आनंद द्विगुणित होईल. आनंददायी उत्सवा साठी पर्यावरण पूरक गणेशोत्सव कशा पद्धतीने साजरा होईल हे पाहणे यानिमित्ताने उशीर ठरेल आणि पर्यावरण पूरक गणेश उत्सव साजरा करण्याचा विचार करणे सुद्धा सध्या गरजेचे आहे .सध्या जागतिक तापमान वाढीमुळे निसर्गाचक्र बदलत आहे मान्सून चक्र सुद्धा बदललेली आहे महापूर, भूस्खलन यासारखा समस्या वाढत आहेत त्यामुळे प्रत्येक सण हे पर्यावरण पूरक कशा पद्धतीने साजरा करता येईल हे पाहणे सध्याच्या काळामध्ये योग्य आहे. गणेश साजरा करताना गणेशो त्सव ध्वनी प्रदुषण, जल प्रदूषण होणार नाही याची काळजी सर्वांनी घेणे गरजेचे आहे.

# नास्तिक माय



भिमराव परघरमोल
मो.नं. 9604056104

आधुनिक केसरी

**अर्धशतकीय काळाच्या आसपास पूर्वीची गोष्ट. एका खेडे गावात एक छोटसं कुटुंब राहत होतं. 'छोटं कुटुंब सुखी कुटुंब' असते हे त्यांना माहीत होतं की नाही? परंतु तात्कालीन परिस्थितीमध्ये लहान कुटुंबासाठी फार मोठी जागरूकता, साधन-संसाधनांच्या  अनुपलब्धतेसह शिक्षणाचा अभाव व गावात तथा शेजारी-पाजारी तसं वातावरण नसतानाही त्यांचा निर्णय मात्र वाखानण्या जोगा होता. बहुतेक हे सर्व श्रेय त्या कुटुंबातील मायलाच जात असावं.  मातृसत्ताक पद्धतीप्रमाणे त्या कुटुंबाची ठेवण असल्यामुळे घरात मायचाच दरारा आणि बोलबाला होता. तसा तो कुटुंबातच होता असं नाही, तर नातेवाईकांसह समाजातही तिच्या शब्दाला वजन असल्याचं आठवते. कारण तिच्याकडे तर्कबुद्धीसह विचार स्वातंत्र्य व हजार जबाबीपणा दाटून भरला होता.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मक्रांतीने रोप्य महोत्सवी वर्ष ओलांडल्यामुळे कुटुंबासह समाजाचा स्वाभिमान जागृत होऊ पाहत होता. परंतु बावीस प्रतिज्ञा रुजायला अजून वेळ होती.

अशात मायच्या संस्कार तथा तालमीत मुलं वाढत नी घडत होती. ती अडाणी असली तरी अज्ञानी नसल्याचं द्योतक म्हणजे तिची शिक्षणासह महापुरुषांच्या विचारांवर प्रचंड आस्था होती. त्यामुळे तिच्याकडे असणारी माहिती मुलांना सांगून त्यांच्यामध्ये ती प्रेरणा व ऊर्जा निर्माण करण्याचं कार्य अविरत करत होती. कुटुंबाचं भलं करण्यासाठी शिक्षण हा एकमेव मार्ग आहे 'पोरानं भलं की, ढोरानं भलं' अशी म्हण अनेकांना सांगून ती मुलांच्या शिक्षणासोबत काही शेळ्या-बकऱ्या, गाई-वासरांचा सांभाळ करत करत होती. तिचा निर्णय चुकत नाही अशा विश्वासाने बाप मात्र तिला विरोध करताना कधीच दिसला नाही.

माय खूप कष्टाळू होती. तिच्याकडे असणाऱ्या जमिनीच्या लहानशा तुकड्यांमध्ये ती राबराब राबायची. पहाटे लवकर उठून मुलाबाळांची आवश्यक ती सर्व कामं आटोपून शेतात गेली, की सूर्यास्ताशिवाय घरी परतायची नाही. मुलं शाळेतून आल्यावर घरातील शक्य ती कामं करून, दारात बसून तिची वाट पाहत बसायची. ती घरी आल्यावर मुलांनी केलेली हलकी-फुलकी कामं बघून तिला बरं वाटायचं. थोडासा विसावा घेऊन पुन्हा भाकर तुकड्याच्या कामी लागावं. असा तिचा अविरत आणि न थांबणारा दिनक्रम होता. तिला ना रविवारची सुट्टी! ना विश्रांती! ना कधी हौसमौजेसाठी कोणत्या गावी जाण्याची संधी!

माय जशी कष्टाळू, स्वाभिमानी आणि कणखर होती तशीच ती निडरही होती. कुटुंबावर आलेल्या कित्येक संकटांना सामोरे जाताना ती थोडीही वाकली किंवा झुकली नाही. आज तिच्या पराक्रमाचा इतिहास साक्ष देतो की, गावातील वस्तीवर झालेला हल्ला परतवताना पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून ती लढली होती. लाठीकाठी चालवता येत नसली, तरी हल्लेखोरांना सामोरे जाऊन मिरचीचं तिखट पाणी आणि त्याची कमतरता भासल्यावर उकळत्या पाण्याने अनेकांच्या अंगाची तिने नाही करून सोडली होती.

कुटुंबावर कोणते संकट येऊ नये, मुलाबाळांना कोणतीही बाधा होऊ नये, म्हणून ती उपास-तापास, व्रत-वैकल्य आणि देवी-देवतांच्या आरत्या-बत्त्याही करायची. नवरात्रामध्ये एका विशिष्ट देवीकडे मुलांना ती न चुकता घेऊन जायची. त्यासाठी एखाद्या श्रीमंताच्या बैलगाडीमध्ये जागा मिळाली तर जाणं येणं सोपं होईल, म्हणून ती विनवण्या करायची. परंतु बरेच लोक तिला टाळून केव्हा निघून निघायचे तिला कळायचंही नाही. तरीही  माघार घेणं मायला पसंत नव्हतं. अशावेळी ती थोडा  प्रवास पायी तर थोडा एसटीने करून आपली भक्ती देवीच्या चरणी अर्पण करायची. देवीची ओटी खना-नारळाने भरून कापुराची ज्योत पेटवायची. त्या ज्योतीवर दोन्ही हात धरून तेच हात मुलांच्या पोटा-पाठीवर फिरवताना तिची याचना मात्र आजही जशीच्या तशी आठवते. एक मुलगा तर्कबुद्धीने तिला काही प्रश्न विचारण्याचा प्रयत्न करायचा. परंतु तिच्याकडे फक्त तेवढीच कमतरता होती, की तिला  वैज्ञानिक दृष्टिकोनातून उत्तर देता येत नव्हती. एव्हाना ती तिच्याकडे नव्हतीच!



वर्षातून एकदा घरी पित्रपाटाचा कार्यक्रम व्हायचा. त्या दिवशी बाप दिवंगत पूर्वजांना मोहफुलांच्या पानांवर जेवू घालायचा. माय मोठ्या हौसेने पंचपक्वान्न करायची. इतर सणाप्रमाणे त्याची रीत वेगळी होती. पूजेपूर्वी मुलांना एक घासही मिळत नव्हता. मुलं हळूच त्यांना म्हणायचे, 'तुम्ही जिवंत असेपर्यंत हे सर्व चालू द्या. परंतु नंतर मात्र पूर्वजांसह तुम्हालाही उपासीच राहावे लागेल. मग सर्व गमतीने हसण्यावरील न्यायचे. काळ लोटत होता, मुलं मोठी होत होती. गावात तिसरीपेक्षा जास्त शिक्षणाची व्यवस्था नव्हती.  मुलींच्या शिक्षणाबद्दल अनास्था व बाहेरगावी पाठविण्याचे गैरसमज इत्यादींमुळे मुलीच्या शिक्षणाला पूर्णविराम मिळाला. तशी मुलांच्या शिक्षणाचीही सेसेहोलपट होतच होती. तेवढ्यात अज्ञानापोटी अल्पवयातच मुलीच्या लग्नाचा घाट घातला. खिशात दमडीही नसताना हुंड्यासह  लग्नाची पंगत श्रीमंतांना साजेशी दिल्यामुळे अनेकांनी तोंडात बोटं घातली. तेव्हा  तिच्या दूरदृष्टीची जाणीव झाली, की तिने शेळ्या-बकऱ्या गाई-वासरांचा सांभाळ का केला असावा?

'उकिरड्याचीही दशा पालटते', या समाजातील रूढ असणाऱ्या म्हणीप्रमाणे मुलं शिकून मोठी झाली. कमावती झाली. त्यांच्या कष्टामुळे जमिनीतील उत्पन्नातही वाढ झाली. माय बापाला सुखाचे दिवस दिसू लागले. मुलगा महापुरुषांची पुस्तक वाचून छोटे-मोठे समाजप्रबोधनाचे कार्यक्रमा घेवू लागला. घरी येणारा-जाणारांचा राबता वाढला. त्यामुळे घरातील वैचारिकता, वैज्ञानिक दृष्टिकोन तथा तर्कबुद्धीला वाव मिळू लागला. या सर्वांमुळे आस्तिक माय नास्तिक न होता, वास्तविक कधी झाली हे कुणालाच कळलं नाही. तिचे उपास-तपास बंद, देवी-देवतांना सुट्टी व पित्रपाटातून पूर्वजांना कायमची मुक्ती मिळाली.

शेवटी एका दुर्धर आजाराने मायला घेरलं. बुद्धाच्या अनित्यवादाच्या सिद्धांताप्रमाणे ती परिनिर्माणस्थ झाली. कुटुंब दुःखाने सैरभैर झालं, तरीही लवकरच सावरलं. कारण आयुष्यभर पुरेल एवढी संस्काराची शिदोरी तिने देऊन ठेवली होती. त्यामुळे घरी एखादा गरजू रडत आला, तर तो हसतच जाईल अशी कुटुंबाची रीत आहे. आज कुटुंबाकडे असणारा सामाजिक मान-सन्मान, थोडाफार पैसा-अडका, जमीन-जुमला ही सर्व मायचीच बदौलत आहे, यात तीळ मात्र शंका नाही.

# श्री गणेश चतुर्थी

आधुनिक केसरी

श्री गणेश चतुर्थीला, तसेच श्री गणेशोत्सवाच्या दिवसांत गणेशतत्त्व नेहमीच्या तुलनेत पृथ्वीवर 1 सहस्र पटीने कार्यरत असते. या काळात केलेल्या श्री गणेशाच्या उपासनेने गणेशतत्त्वाचा अधिक लाभ होतो.

श्री गणेश चतुर्थीस आचरण्यात येणारे व्रत हे सिद्धीविनायक व्रत या नावाने ओळखले जाते. वास्तविक हे व्रत सर्व कुटुंबांत होणे क्रमप्राप्त आहे. सर्व भाऊ एकत्र रहात असतील म्हणजेच त्यांचा द्रव्यकोश (खजिना) आणि पाकनिष्पत्ती (चूल) एकत्र असेल, तर सर्वांत मिळून एक मूर्ती पुजली तरी चालते; पण ज्या वेळी द्रव्यकोश आणि पाकनिष्पत्ती कोणत्याही कारणास्तव विभक्त असतील, तर त्यांनी आपापल्या घरी स्वतंत्र गणेशमूर्ती पुजावी. ज्या कुटुंबात एकच गणपति बसवण्याची दृढ परंपरा आहे, त्या कुटुंबात ज्या भावामध्ये देवाविषयी अधिक भाव आहे, त्याच्याच घरी गणपती बसवावा. 2. नवीन मूर्तीचे प्रयोजन : पूजेत गणपति असला, तरी गणपतीची नवीन मूर्ती आणावी. श्री गणेश चतुर्थीच्या वेळी गणेशलहरी पृथ्वीवर खूप जास्त प्रमाणात येतात. त्यांचे आवाहन नेहमीच्या पूजेतील मूर्तीत केल्यास तिच्यात खूप जास्त शक्ती येईल. जास्त शक्ती असलेल्या मूर्तीची साग्रसंगीत पूजाअर्चा वर्षभर नीटपणे करणे कठीण जाते; कारण त्यासाठी कर्मकांडातील बंधने पाळावी लागतात. म्हणून गणेशलहरींचे आवाहन करण्यासाठी नवीन मूर्ती वापरतात आणि ती मूर्ती नंतर विसर्जित करतात.

: चिकणमाती किंवा शाडूची माती यांपासून मूर्ती बनवावी, असा शास्त्रविधी आहे. अन्य वस्तूंपासून (उदा. प्लास्टर ऑफ पॅरिस, कागदाचा लगदा) मूर्ती बनवणे, हे धर्मशास्त्रविरोधी, तसेच पर्यावरणाला घातक आहे. मूर्तीची उंची अधिकाधिक एक फूट ते दीड फूट असावी. मूर्ती शास्त्रानुसार बनवलेली, पाटावर बसलेली, डाव्या सोंडेची अन् नैसर्गिक रंगांनी रंगवलेली असावी. परंपरा किंवा आवड यांप्रमाणे गणेशमूर्ती आणण्यापेक्षा धर्मशास्त्रसंमत गणेशमूर्ती पुजावी. 3. शास्त्रोक्त विधी आणि रूढी यांचा अवधी : भाद्रपद शुद्ध चतुर्थीस मातीचा गणपति करतात. तो डाव्या हातावर ठेवून तेथेच त्याची सिद्धीविनायक या नावाने प्राणप्रतिष्ठा आणि पूजा करून लगेच विसर्जन करावे, असा शास्त्रविधी आहे; पण मनुष्य हा उत्सवप्रिय असल्याने एवढ्याने त्याचे समाधान होईना; म्हणून दीड, पाच, सात किंवा दहा दिवस श्री गणपति ठेवून त्याचा उत्सव करू लागला. बरेच जण (ज्येष्ठा) गौरी बरोबर गणपतीचे विसर्जन करतात. एखाद्याच्या कुलाचारात गणपति पाच दिवस असेल आणि तो त्याला दीड किंवा सात दिवसांचा करावयाचा असला, तर तो तसे करू शकतो. यासाठी अधिकारी व्यक्तीस विचारण्याची जरूरी नाही. रूढीप्रमाणे पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या, सहाव्या, सातव्या किंवा दहाव्या दिवशी श्री गणेविसर्जन करावे. 4. मूर्तीची आसनावर स्थापना : पूजेपूर्वी ज्या पाटावर मूर्तीची स्थापना करायची असते, त्यावर तांदूळ (धान्य) ठेवून त्यावर मूर्ती ठेवतात. आपापल्या प्रथेप्रमाणे थोडे तांदूळ किंवा तांदुळाचा लहानसा ढीग करतात. मूर्तीत गणपतीचे आवाहन करून तिची पूजा केल्याने मूर्तीत शक्ती निर्माण होते. त्या शक्तीमुळे तांदूळ भारित होतात. सारख्या कंपनसंख्येच्या दोन तंबोऱ्याच्या दोन तारा असल्या, तर एकीतून नाद काढल्यास तसा नाद दुसऱ्या तारेतूनही येतो. त्याचप्रमाणे मूर्तीखाली तांदुळात शक्तीमुळे स्पंदने निर्माण झाली की, घरातील तांदुळाच्या साठ्यातही शक्तीची स्पंदने निर्माण होतात. अशा तऱ्हेने शक्तीने भारित झालेले तांदूळ वर्षभर प्रसाद म्हणून खाता येतात. श्री गणेशचतुर्थीसाठी पुजावयाची मूर्ती शक्यतो आदल्या दिवशीच आणून ठेवावी. अ. श्री गणेशाची मूर्ती घरी आणण्यासाठी घरातील कर्त्या पुरुषाने इतरांसह जावे. आ. मूर्ती हातात घेणाऱ्याने हिंदू वेशभूषा करावी, म्हणजे अंगरखा (सदरा)-धोतर किंवा अंगरखा-पायजमा परिधान करावा. त्याने डोक्यावर टोपीही घालावी. इ. मूर्ती आणतांना तिच्यावर रेशमी, सुती किंवा खादीचे स्वच्छ वस्त्र घालावे. मूर्ती घरी आणतांना मूर्तीचे मुख आणणाऱ्याकडे आणि पाठ समोरच्या दिशेस असावी. मूर्तीच्या समोरच्या भागातून सगुण तत्त्व, तर पाठच्या भागातून निर्गुण तत्त्व प्रक्षेपित होत असते. मूर्ती हातात धरणारा हा पूजक असतो.  मूर्तीचे मुख त्याच्याकडे केल्यामुळे त्याला सगुण तत्त्वाचा लाभ होतो, तर इतरांना निर्गुण तत्त्वाचा लाभ होतो. घराच्या उंबरठ्याबाहेर उभे रहावे. ऊ. घरात प्रवेश करण्यापूर्वी मूर्तीचे मुख समोरील दिशेस करावे. यानंतर मूर्तीचे औक्षण करून ती घरात आणावी.  सजवलेल्या मखरात पाटावर किंवा चौरंगावर थोड्या अक्षता घालून त्यावर मूर्ती ठेवावी. सजावट पूर्ण व्हायची असल्यास मूर्ती अन्य सुरक्षित जागी ठेवून सजावट लवकरात लवकर पूर्ण करावी. मूर्तीला मखरात बसवल्यानंतर मूर्ती हलणार नाही किंवा मूर्तीस काही अपाय होणार नाही, याची काळजी घ्यावी. मूर्तीवर एखादे वस्त्र किंवा रूमाल घालून ती झाकून ठेवावी. उंदराची मूर्ती वेगळी असल्यास तीही सुरक्षित ठेवावी. मूर्तीचे मुख पश्चिम दिशेला असेल अशा पद्धतीने ठेवावी, तसे शक्य नसल्यास पूजकाने पूजा करतांना स्वतःचे तोंड दक्षिण किंवा पश्चिम दिशेला येणार नाही, अशा पद्धतीने बसावे. मूर्तीचे तोंड पूर्व किंवा उत्तर दिशेला असेल, तर पूजकाने मूर्तीच्या डाव्या हाताला काटकोनात बसावे, म्हणजे पूजकाचे मुख उत्तरेला किंवा पूर्वेला होईल.

# कावसानकर स्टेडियमवर अतिक्रमण; क्रीडाप्रेमीचा पेटवून घेण्याचा प्रयत्न

## अमरण उपोषणाला शहर व तालुका व्यापारी महासंघाचा पाठिंबा

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** शहरातील स्व. कावसानकर क्रीडा मैदानातून रस्ता होत असल्याने हा रस्ता अतिक्रमण करुन होत असल्याचा अरोप विजय सुते यांनी लेखी निवेदन देऊन अतिक्रमण हटवा व क्रिडा प्रेमींना न्याय द्यावा अशी मागणी संबंधित प्रशासनाला केली होती. मात्र याकडे दुर्लक्ष होत असल्याने आता पैठण शहरातील बहुतांशी संघटना तसेच शहर व तालुका व्यापारी संघटनी तहसीलदार यांना निवेदन देवुन पाठिंबा दिला. चार दिवसांत क्रीडा अधिकारी तसेच तहसीलदार यांनी या बाबतीत काहीच हालचाली करत नसल्याने विजय सुते यांनी तहसीलदार यांना फोनवरून संभाषण केले असता तहसीलदार





सारंग चव्हाण पैठण - येथील कावसनकर स्टेडियम च्या अतिक्रमण काढण्यासाठी उपोषण सुरू आहे दरम्यान मागण्या मान्य होत नसल्याने तसेच तहसीलदार यांनी उपोषण कर्ते सुते यांना तुमचे काय ते सांगा म्हणताच उपोषण कर्त्यांनी अंगावर डिझेल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. वेळीच उपोषणस्थळी उपस्थित मित्रांनी रोखल्याने घटना टळली. तहसीलदार चव्हाण यांच्या विरोधात घोषणाबाजी करत तहसीलदारानी पैसे घेतले असल्याचा संशयीत अरोप केला त्यामुळे शहरात थोडा काळ वातावरण तंग झाले होते.

तहसीलदार यांना उपोषण स्थळी भेट देवुन स्डेडीयमच्या ठिकाणी भिंत घालून घेऊन क्रिडांगणाची मोजणी करणार असल्याचे सांगितले. या बेकायदेशीर प्रकरणाची चौकशी करून संबंधित अधिकारी, कर्मचारी यांच्याविरुद्ध कारवाई करावी. यासाठी विजय सुते, अजय परळकर, कपील कावसानकर, ॲड. प्रमोद सरोदे, प्रसाद लोळगे, राजेंद्र पातकळ, निसार बागवान, विजय गव्हाणे, शिवनाथ शिंदे, सचिन गवळी, अक्षय ससाणे, निखिल पापुलवार यांच्यासह मोठ्या प्रमाणावर क्रीडाप्रेमीचे सोमवारी चौथ्या दिवशी उपोषण चालुच आहे.



# सण उत्सव काळात वीज पुरवठा खंडित नको; शहर व्यापारी महासंघाचे निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** येणाऱ्या उत्सव काळात पैठण शहरातील व परिसरातील विद्युत पुरवठा सुरळीत राहण्याकरिता आज पैठण शहर व्यापारी महासंघाच्या वतीने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे कार्यकारी उपअभियंता घुले यांना निवेदन देण्यात आले.

मागील काही दिवसांपासून पैठण शहरातील विद्युत पुरवठा सतत खंडित होत आहे. आता येणाऱ्या काळात उद्या पासून गणेशोत्सव, महालक्ष्मी, नवरात्रोत्सव, दसरा, दीपावली असे सतत मोठे सण, उत्सव साजरे होणार आहेत. त्यासाठी शहरातील नागरिक, आपले पैठण शहरांत येणारे पर्यटक, वारकरी हे बहुसंख्य प्रमाणात शहरात खरेदीसाठी येत असतात.त्यात हा अवेळी होणारा खंडित होणाऱ्या विद्युत पुरवठा मुळे व्यापाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे आणि पहिलेच व्यापारी नागरिक पाऊस अत्यल्प असल्याने हैराण असून विद्युत मंडळाच्या अशा गलथान कारभारामुळे नागरिक, व्यापारी भरडले जात आहे. त्या अनुषंगाने आज पैठण शहर व्यापारी महासंघाच्या वतीने विद्युत मंडळाचे कार्यकारी उपअभियंता घुले यांना शहरातील विद्युत पुरवठा सुरळीत राहण्या संबधी निवेदन दिले.त्यांनी सुद्धा आता उत्सव काळात वीज पुरवठा खंडित होणार नाही याची ग्वाही शहर व्यापारी महासंघाच्या पदाधिकारी यांच्याशी बोलताना दिली. यावेळी पैठण शहर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष पवन लोहिया, सचिव बलराम लोळगे, योगेश लोहिया, उमेश तट्टू, बाळू आहेर, लक्ष्मण लबडे व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# इनोव्हेरा करिअर अकॅडमीचा वर्धापन दिन

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** ता.खंडाळा येथे दि.१० सप्टेंबर २०२२ रोजी इनोव्हेरा करिअर अकॅडमीची स्थापना करण्यात आली. खंडाळा तालुक्यातील एक मोठी अभ्यासिका उपलब्ध झाली.याच अभ्यासिकेतून एकाच वर्षात १४ अधिकारी घडवण्याची संधी इनोव्हेरा करिअर अकॅडमीला मिळाली. हा यशाचा क्षण इनोव्हेरा करिअर अकॅडमीने प्रथम वर्धापन दिन यशस्वी गुणवंत आणि मान्यवरांच्या उपस्थितीत साजरा केला. यश मिळविलेल्या गुणवंतांच्या सन्मान सोहळ्याने संपन्न केला.यावेळी विविध मान्यवरांच्या हस्ते गुणवंतांचा सत्कार घेण्यात आला.तसेच वृक्ष देऊन ही झाडे लावा झाडे जगवा चा संदेश देण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लोणंदच्या नगराध्यक्षा सीमा खरात, उपजिल्हाधिकारी विकास व्यवहारे, पोलीस निरीक्षक हर्षद गालिंदे, मस्कुअण्णा शेळके, पाडेगावचे सरपंच राहुल कोकरे, कोरेगाव सरपंच सुनीलभाऊ शिंदे, सुभेदार काकडे, सुजन फौंडेशनचे अजित जाधव, हेमंत सुतार, विकी येळे, प्रशांत ढावरे, तुळशीराम ताम्हाणे,दशरथ मोहिते, नानासाहेब जगताप, आबासाहेब मोरे, चंद्रकांत गोरे, सागर भोसले व इतर उपस्थित होते. प्रशासकीय, राजकीय सामाजिक क्षेत्रातून आलेल्या मान्यवरांनी चर्चा संवाद साधल्याने सर्वांसाठी विचारांची मेजवानी ठरली. स्वयंशिस्त, प्रामाणिक प्रयत्न आणि सातत्य या त्रिसूत्रीतून यशाचे शिखर हमखास गाठता येते त्यासाठी कोणताही शॉर्टकट नसतो. प्रणाली माने, सारिका शिंदे, पूनम कोळपे, विश्वनाथ गोवकर, भगवान धायगुडे, धुळा कराडे, अक्षय करे, अरस्तू रंगारी, अनिकेत बडे आदी गुणवंतांनी यश मिळविलेले आहे. इनोव्हेरा करिअर अकॅडमीचे विशेष शैक्षणिक कार्य सुरू असल्याने मान्यवरांनी कौतुक केले. तसेच पुढील वाटचालीस सुद्धा शुभेच्छा देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण बनकर व स्वागत गिरीश बनकर, अनिल कोकरे, संदेश नेवसे यांनी केले. किरण जाधव यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इनोव्हेरा संचालक मंडळ व स्टाफ यांनी विशेष प्रयत्न केले.



# गणेशोत्सवात निःशुल्क योग शिबिरांचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** महाराष्ट्रातील प्रत्येक गावात तर शहरातील प्रत्येक गल्लीत गणेश उत्सव साजरी करण होत असते. योग शिबिर घेण्यासाठी बऱ्याच ठिकाणी माइक, व्यासपीठ व आसन व्यवस्था असते. पतंजली योगपीठ परिवार नांदेड शहरात व जिल्हाभर 101 ठिकाणी तर महाराष्ट्र पूर्वच्या 18 जिल्ह्यांमध्ये 1001 ठिकाणी योग शिबिरे लावण्याचा संकल्प केला आहे. सकाळी 5.00 ते 7.00 दरम्यान योग शिबिर घेण्यासाठी योग्य वेळ आहे.

या वेळेत गणपती व्यवस्थापनात आरती वगैरे कार्यास योग शिबिरामुळे कोणतेही अडचण होत नाही. पतंजली योगपीठ परिवार सर्व गणेश उत्सव मंडळांना विनंती करते की आपण आपल्या गणपती पुढे रोज सकाळी पाच ते सात दिवसाचा योग शिबिराचे आयोजन करावे, जेणेकरून जास्तीत जास्त लोकांना योग शिबिराचा लाभ होईल. तसेच सर्व योग शिक्षकांना विनंती करण्यात येते की आपण गणेश मंडळातील व्यवस्थापकाना भेटून शिबिराचे आयोजन करावे.

# वारेगावच्या सरपंचपदी रत्नप्रभा बोरसे

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वारेगाव येथील ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी रत्नप्रभा संदीप बोरसे तर उपसरपंचपदी सीताराम धटिंग यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सदरील निवडणूक बुधवारी (१३ सप्टेंबर) पार पडली. वारेगाव येथील मागील सरपंचांचा अडीच वर्षांचा कार्यकाळ संपल्यानंतर पुढील अडीच वर्षांकरिता नवीन सरपंच, उपसरपंच यांची निवड बुधवारी घेण्यात आली. यात रत्नप्रभा संदीप बोरसे सरपंचपदी तर उपसरपंचपदी सीताराम धाटिंग यांची बिनविरोध निवड झाली. या प्रसंगी ग्रामपंचायत सदस्य वैशाली बबन जाधव, मुक्तेश्वर जाधव, आप्पासाहे जाधव, बप्पा थोरात, सुमनबाई जाधव, अनिता संकपाळ, संगीता जाईवार यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. सरपंच निवड प्रक्रिया मंडळ अधिकारी अर्जुन महाजन, तलाठी भगवान ढोरमारे, ग्रामविकास अधिकारी खाकरे यांनी पार पाडली.





# 75 वा मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वावना येथील श्री सोमेश्वर सार्वजनिक वाचनालय येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा करण्यात आला यावेळी सरपंच भागाबाई काकडे यांच्या हस्ते फडकवण्यात आला. यावेळी कार्यक्रमास उपसरपंच दामोदर जाधव सोसायटी चेअरमन योगेश जाधव प्राथमिक शाळा मुख्याध्यापक व शिक्षक वर्ग त्याचप्रमाणे ग्रामसेवक व वाचक उपस्थित होते. यावेळी ज्ञानेश्वर जाधव संचालक सार्वजनिक वाचनालय यांनी आभार मानले.

# सुषमा अंधारेंच्या विभक्त पतींच्या कारवर हल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांचे विभक्त पती तथा शिवसेना शिंदे गटाचे नेते वैजनाथ वाघमारे यांच्या कारवर हल्ला झाल्याची घटना सोमवारी पहाटे होळ (ता. केज) जवळ घडली. या दगडफेकीत वैजनाथ वाघमारे यांच्या छातीला दगड लागला असून मुलगा आणि पुतण्यादेखील जखमी झाले आहे याबाबतची माहिती स्वतः वैजनाथ वाघमारे यांनी चित्रफितीद्वारे दिली आहे. बीड जिल्ह्यातील होळ ( ता. केज ) येथे सोमवार दि.१८ सप्टेंबर रोजी पहाटे अज्ञात समाजकंटकांनी शिंदे गटाचे नेते वैजनाथ वाघमारे यांच्या चार चाकी वाहनावर अंदाधुंद दगडफेक केली. यामध्ये वाहनात बसलेले वैजनाथ शिंदे यांच्यासह मुलगा आणि पुतण्या देखील जखमी झाले आहेत. आतील भागात देखील दगड फेकण्यात आले होते.






# राजूर येथे मोरेश्वर विद्यालयात मुक्तीसंग्रामदिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** येथे मोरेश्वर विद्यालयात अमृत महोत्सवी मराठवाडा मुक्ति संग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टदार सुधाकरराव दानवे तर प्रमुख पाहूणे म्हणून भगवान नागवे पंडित पुंगळे, गजू डिक्कर, अर्जुन मांगडे, प्राचार्य संतोष सोनूने, पर्यवेक्षक संतोष इंगळे, इंग्लीश स्कूलचे मार्गदर्शक सुनिल दानवे, प्रा. मोहिते, मुख्याध्यापक किरड यांसह अनेकांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी वेशभूषा भाषण, देशभक्तीपर गीते, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, निबंध स्पर्धा यासारख्या स्पर्धेत भाग घेतला होता. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिस वितरित करण्यात आले. विद्यालयातील शिक्षक सोपान जावळे यांनी मराठवाडा मुक्तीसंग्राम लढ्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. या प्रसंगी मोरेश्वर माध्यामिक व उच्च माध्यमिक विद्यालय व मोरेश्वर इंग्लिश स्कुलचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमांचे सूत्रसंचालन एस.एस.माळी यांनी केले. तर आभार डी. ए.घायतडक यांनी मानले.

# पुणे- मुंबई मार्गावरील बोरघाट धुक्यात हरवला

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** मुंबई द्रुतगती मार्गवरील बोरघाट धुक्यात हरवल्याची चित्र बघायला मिळाले. वाहनांची हेडलाईट लावून वाहन चालकांना वाहन चालवावी लागली. एरवी वाहतूक कोंडीमुळे वाहन चालकांना कसरत करावे लागते. परंतु, आज सकाळी धुक्यामुळे वाहन चालकांना कसरत करावी लागली. गाडीची हेडलाईट लावून वाहने चालवली. पुणे- मुंबई दुर्गती मार्गावरून दररोज लाखो वाहने प्रवास करतात. अनेकदा बोरघाटात वाहतूक कोंडीमुळे वाहन चालकांना कसरत करावी लागते. आज मात्र वाहतूक कोंडी ऐवजी धुक्यामुळे वाहनचालकांना कसरत करावी लागली. घनदाट धुक्यामुळे वाहन चालकांना काही फुटावरील दिसत नसल्याने हेडलाईट लावून वाहन चालवावी लागली. त्याचबरोबर वाहनाचा स्पीड देखील यावेळी मंदावला होता. बोरघाटातील धुके बघण्यासाठी अनेक वाहन चालक वाहन रस्त्याला लावून थांबले होते. निसर्गाचा हे अल्हाददायक रूप बघण्यासाठी अनेकजण लोणावळ्यात दाखल होतात.



# आंध्र बसचा मुक्काम आता महर्षी चौकऐवजी महाराष्ट्र बस स्थानकात

## तहसीलदार यांनी लेखी स्वरूपात दिलेले पत्र धूळखात!

आधुनिक केसरी न्यूज

**बाबूराव गोणारकर**

**धर्माबाद :** महाराष्ट्र शासनाचा व राष्ट्रीय परिवहन महामंडळ यांचा महसूल बुडत आहे. तहसीलदार यांनी दिलेल्या पत्राची अंमलबजावणी होत नसून अनाधिकृत आंध्रा बस स्टॉप हे महर्षी वाल्मिकी चौक येथे राष्ट्रीय राष्ट्रीय परिवहन महामंडळ विभागासोबत कसलाही करार तेलंगाना येथील आगारप्रमुखांनी न करता तेलंगणातील बसेस चालूच ठेवल्या. सविस्तर वृत्त असे की, धर्माबाद ही एक मोठी बाजार पेठ असून दररोज आंध्रा प्रदेश व तेलंगणा आणि महाराष्ट्राच्या काना कोपऱ्यातून हजारो लोक विविध कामांच्या निमित्ताने धर्माबाद शहरात येत असतात.

तालुक्यात महाराष्ट्र बस स्थानक आहे तेलंगणातील काही बस सेवा फक्त महर्षी चौक पर्यंतच येऊन तिथून परतत होतात त्यामुळे इतर नागरिकांना चक्क महाराष्ट्र बस स्थानकापासून महर्षी चौकपर्यंत पायी चालत जावे लागते किंवा ऑटो ने तीस रुपये देऊन जावे लागत असे याचा त्रास महाराष्ट्रातून आंध्र प्रदेश व तेलंगणा राज्यात जाणाऱ्या महाराष्ट्रीयन प्रवाशांना होत होता म्हणून रिपब्लिकन सेनेचे तालुका अध्यक्ष साहेबराव दुगाने, डी के पाटिल व वंचित बहुजन आघाडी चे शहर उपाध्यक्ष किरण गजभारे, राहुल शिरसे यांनी व सहकार्यांनी दिनांक 13 सप्टेंबर रोजी रिपब्लिकन सेनेचे धर्माबाद तालुकाध्यक्ष साहेबराव दुगाने यांच्या नेतृत्वात महर्षी चौक येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाची दखल घेत धर्माबाद तहसीलदार यांनी भैसा व निर्मल वाहतूक नियंत्रण अधिकाऱ्यांना पत्र देऊन सदर आंदोलनांची माहिती देत तेलंगणा राज्यातून येणाऱ्या बसेस महर्षी चौक अनधिकृत ( आंध्रा बस स्टॉप ) येथे थांबवण्या ऐवजी ते अधिकृत महाराष्ट्र बसस्थानकात थांबवण्यात यावेत अन्यथा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो अशी लेखी विनंती वजा सल्ला दिला होता. या रास्ता रोको आंदोलनाच्या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी मा. अभिजीत राऊत, पोलीस अधीक्षक नांदेड, धर्माबाद तहसीलदार व पोलीस निरीक्षक व तेलंगणा राज्याच्या आगार प्रमुख यांना देण्यात आले होते.

या दरम्यान सर्व बाबींची चौकशी करून नायब तहसीलदार गावंडे यांनी तोंडी व लेखी आश्वासन दिले व सदरील विभागाला पत्रव्यवहार केला त्यामुळे आज पासून ( आंध्रा बस स्टॉप )च्या ऐवजी महाराष्ट्र व स्थानक या ठिकाणी तेलंगणातील सर्व बसेस थांबण्यात येणार आहे. त्यामूळे महाराष्ट्रातून आंध्र व तेलंगणा राज्यात जाणाऱ्या धर्माबाद तालुका वाशीयांसाठी व महाराष्ट्र राज्याच्या विविध भागांतून धर्माबाद शहरात ये जा करणाऱ्या प्रवाशांची गैरसोय या पुढे होणार नसल्याने समाधान व्यक्त केल्या जात आहे. परंतु तहसीलदारांचा आदेश तेलंगानातील आगार प्रमुख यांनी कचऱ्याच्या डब्यात टाकून आपला मनमानी कारभार सुरूच ठेवला आहे. याकडे वाहतूक शाखेने सुद्धा कानाडोळा केला आहे. अनधिकृत आंध्रा बस स्टॉप या ठिकाणी बसेस थांबून विद्यार्थी नागरिक व्यवसायिक यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.



मा . तहसीलदार साहेबांनी या सर्व बाबींची दखल घेऊन लवकरात लवकर हा अजब गजब कारभार थांबवावा अन्यथा होणाऱ्या परिणामास संबंधित प्रशासन जबाबदार असेल .
**संजय पवार, माजी नगरसेवक**

ही मागणी तालुक्यातील व्यापारी वर्ग शिक्षक प्रवासी कर्मचारी यांच्या हितासाठीच आहे व या मागणीचा शासनाने दखल घेऊन लवकरात लवकर योग्य तो निर्णय घ्यावा यासाठी भाजप पक्ष आंदोलन करताना जाहीर पाठिंबा असणार आहे . **रवींद्र पोतगंटीवार**

धर्माबाद हे तेलंगाना सीमा वरती भाग असून व्यापारासाठी दळणवळणासाठी शैक्षणिक क्षेत्र इत्यादींसाठी महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे तेलंगणातील बस हे महाराष्ट्र बस स्थानकात येत नसल्यामुळे प्रवाशांना ऑटोला वेगळे पैसे मोजावे लागत आहेत . यात प्रवाशांची गैरसोय होत आहे . **गणेश गिरी**

तहसीलदारांच्या पत्राचा आदेश स्थानिक प्रशासनाने कोरा पेपर म्हणून वाळीत ठेवला . म्हणून तेलंगणातील बस महाराष्ट्र बस स्थानकात येण्याऐवजी अनधिकृत ( आंध्रा बस स्टॅन्ड ) येथेच येऊन परत तेलंगाना रवाना होत आहे .यात तालुक्यातील एका मोठ्या अधिकाऱ्याने लाच घेतली का ! असा प्रश्न जनतेतून निर्माण होत आहे .

# 'बेटी बचाओ-बेटी पढाओ, मुलींच्या जन्माचे स्वागत करा' अंतर्गत वैजापुरात बालिका दिन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** मुलींच्या जन्माबाबत पालकांचे विधायक व सकारात्मक मत व्हावे,देशातील पालकांनी मुलींच्या जन्माचे स्वागत करावे, मुलगा मुलगी समान समजावे, कमी वयात मुलींचे लग्न करू नये,मुलींची हेळसांड थांबवावी,मुलींना उच्च शिक्षण देऊन सक्षम ,सुदृढ करावे, मुली सक्षमीकरणला प्राधान्य द्यावे,"बेटी बचाओ-बेटी पढाओ" हा संदेश घरा-घरात जावा व मुलींनीही चुकीचे पाऊल उचलू नये, या बाबी समाज मनात बिंबविण्यासाठी निर्मला इन्स्टिट्यूट या सामाजिक संस्थेने आयोजित केलेला बालिका दिन व त्या अंतर्गत वरील विषयाशी संबंधित नाटिका, गाणी व नृत्य तसेच डॉक्टर, वकील व पोलीस यांचे प्रबोधनपर भाषण व मनोगत हे कार्यक्रम मुलींचे हित जपणारा आहे, असे कार्यक्रम ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी सामाजिक संस्था निर्मला इन्स्टिट्यूट ने आयोजित बालिका दिन कार्यक्रमात रविवार( ता.१७ )रोजी केले. या प्रसंगी डॉ. प्रतिमा सोनवणे, ॲड. नुसरत सय्यद, स.पो.नि. संदीपसिंह राजपूत, सपोनि ए. आर. पाटील यांनीही मुलींना सक्षम होण्यासाठी शिक्षण गरजेचे आहे. मुलींनी निडर होऊन जगावे असा सल्ला दिला. या प्रसंगी या संस्थेच्या नॅन्सी रोद्रीग्ज, मार्गरिट, छाया बंगाळ व इरफान सय्यद यांनी हा कार्यक्रम आयोजित करण्यात पुढाकार घेतला, बोरसर, रोटेगाव, आघुर व ग्रामीण भागातील मुलींनी नाटिका, गाणी, नृत्य व संवादाच्या सादरीकरनातून मुलींच्या बाबत विधायक व रचनात्मक कार्यक्रम सादर केले.



# आ. अमित झनक यांच्या हस्ते विकास कामांचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज



**रिसोड :** रिसोड मालेगाव विधानसभा मतदार संघांचे युवा आमदार अमित झनक यांच्या विकास निधीतून रिसोड शहरातील मंजूर झालेल्या विविध विकासात्मक कामाचे भूमिपूजन शनिवार 16सप्टेंबर ला करण्यात आले.शिवाजी नगर मधील  हनुमान मंदिर सभामंडप व शिवाजी नगर परिसरातील अष्टविनायक नगर मधील गणेश मंदिरातिल सभामंडपाचे भूमिपूजन आमदार अमित झनक यांच्या शुभ हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. अष्टविनायक गणेश मंदिरात झालेल्या कार्यक्रमाला आमदार अमित झनक सह भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर, इंजिनिअर बाळासाहेब देशमुख,माजी पं स सभापती तुकाराम मोरे, नगर सेवक अकबर बागबान, माजी नगर सेवक फय्याज अहमद,इ रफानभाई,बंडू हाडे, प्रशांत खराटे,गजानन निखाते, राजूभाऊ राऊत, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती संजय शिंदे, संचालक रवि चोपडे, भीमराव शेजूळ, बबनराव गारडे, इत्यादी मान्यवर उपस्थित होते. रिसोड शहरातील विकास कामासाठी शासनाकडून निधी खेचून आणण्यासाठी विशेष प्रयत्न करू.मतदार संघाच्या विकासासाठी कटीबद्ध असल्याचे मनोगत अमित झनक यांनी व्यक्त केले. आमदारांनी काही दिवसापूर्वी दिलेला शब्द पाळून निधी उपलब्ध करून दिला त्याबद्दल शिवाजी नगर व अष्टविनायक नगर वासीयांनी आमदारांचे विशेष आभार मानले. स्व. पुष्पादेवी पाटील महाविद्यालय पासून असलेल्या ऐंशी फुटच्या रस्त्याचे काम करून देण्याची मागणी करण्यात आली तसेच शिवाजी नगरमधील अंतर्गत रस्त्याची अवस्था फार वाईट झाली असून पावसाळ्यात ये जा करनेही कठीण होते या रस्त्यासाठी ही लक्ष घालून निधी उपलब्ध करून द्यावा अशी विनंती केली.

# नदीजोडसाठी  १४ हजार कोटींची तरतूद

## बाजारसावंगीची धांड नदी जोडली जाईल का गिरिजा प्रकल्पात

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** बाजार सावंगी येथील धांड नदी गिरीजा मध्यम प्रकल्प जोड प्रक्रीया गत १८-१९ वर्षापासून चालढकल मधे अडकली असुण पाहणी ,सर्व्हे, मोजणी फार्स होते की काय अशी शंका आता नागरिकांनी येत आहे. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळा पासुन नदीजोड प्रकल्प कार्यक्रम हाती घेण्यात आले होते. तेव्हा पासून बाजार सावंगी, ता. खुलताबाद. येथील धांड नदी गिरीजा प्रकल्पासी जोडण्याची प्रक्रिया कार्यक्रम हाती घेण्यात आले होते. यासाठी अनेक वेळा प्रशासनाने सावंगी शिवारचे दोन ठिकाणी तर ताजनापूर शिवारात एक ठिकाणी नदी जोड साठी पाहणी केली होती. तर शेवटी सहजतेने गिरीजा प्रकल्पांत पाणी पोहचण्यासाठी बाजार सावंगी लक्ष्मीआई जवळ नाल्याद्वारे गिरीजा मध्यम प्रकल्पात पाणी वळवण्याचे ठरले होते. परंतु कोठे मासी शिंकली नाही माहित गत १९-२० वर्षांपासून नदीजोड प्रकल्प रखडला आहे. यात मध्यांतरी लोकप्रतिनिधी ने लोकांना आशा दाखवत निराशा केली. धांडनदी जोड प्रकल्प जे की गिरीजा मध्यम प्रकल्पांसाठी अतिशय महत्त्वाचे आहे. कारण येथे बाजार सावंगीत निमनदी बोडखा नदी पाडळी नदी रेल नाला तिरंगी -चौरंगी नदी संगम येथे आहे.( यंदा पाऊस नाही ) नसता चौरंगी नद्यांचे संगम बघता येथे सतत नद्यांना पुरपाणी धांडनदी द्वारें वाहत असतं.व ते खाली वाया वाहुन जाते.पावसाळ्यात सततचे पुरपाणी वाहते बघता येथे नदीजोड प्रकल्प राबविले जाणार होते व त्यासाठी ठिकाणी जागा पाहणी सर्व्हे मोजणी करण्यात आली होती. परंतु नाही माहिती.नंतर काय झाले. काय नाही.पण गत १९-२० वर्षापासून नदीजोड प्रकल्प रखडलं आहे. यंदा छ.संभाजीनगर येथे मंत्री मंडळाच्या बैठकीत नदीजोड प्रकल्पासाठी १४हजार कोटी रुपायाची तरतुद करण्यात आली आहे.आता तरी बाजार सावंगी येथील धांडनदी तून गिरीजा प्रकल्पांत पाणी वळवण्यात येईला का असे तीव्र प्रतिक्रिया नागरिकांतुन ऐकण्यास मिळत आहे.नदीजोड प्रकल्पांमुळे खुलताबाद तालुका व शहरांचे पाणी टंचाई हा प्रश्नच संपूष्टात येईल. पाणी टंचाईचा विचार करता रखडलेला नदीजोड प्रकल्प राबवावा, असी मागणी नागरिकांतुन होत आहे.



# जिंतूर पोलिसांनी केला चालकदिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** महामार्ग पोलीसांकडून वाहन चालक दिनानिमित्त असल्याकारणाने औंढा ते जालना मा. अपर पोलीस महासंचालक साहेब (वा) महाराष्ट्र राज्य मुंबई, मा. पोलीस अधीक्षक महामार्ग पोलीस प्रादेशिक विभाग औरंगाबाद,मा. पोलीस उप अधिक्षक प्रादेशिक विभाग औरंगाबाद मा.पोलीस निरीक्षक नांदेड  यांच्या मार्गदर्शनाखाली  खालील ठिकाणी चालक दिन साजरा करण्यात आला आहे.

NH 752 (I) जालना ते औंढा रोडवर  ट्रक चालकांना, कार चालकांना, बस चालकांना तसेच म.पो. केंद्राचे चालक यांना पुष्पगुच्छ  व  शुभेच्छा देऊन चालकदिन साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमास  विनायक जाधव सहाय्यक पोलीस निरीक्षक,पोउपनि गणेश कदम  व अंमलदार  शकील शेख, सचिन गुरसुडकर, बालासाहेब गिराम यांनी चालक दिन साजरा केला व चालकांना वाहतूक नियमाचे मार्गदर्शन करण्यात आले आहे. पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.



# संविधान परीक्षेसाठी ब्रिलियंटचे ४२ परीक्षार्थी

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** आमचे ध्येय संविधान जनजगृतीसाठी-भावी पिढीच्या उत्कर्षासाठी" हा संकल्प बाळगून रक्षित सामाजिक संस्था म्हसळे अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या संविधान गुणगौरव समितीच्या वतीने संविधान गुणगौरव परीक्षा-२०२३ चे आयोजन करण्यात आलेले आहे. ही परीक्षा राज्य स्तरावर घेण्यात येत असून या परीक्षेसाठी विविध शाळांतील विद्यार्थीच नव्हे तर शाळेच्या प्रमुखांसह शिक्षकवृंद सुद्धा इच्छुक झालेले आहेत. परीक्षेचा अर्ज भरून नोंदणी करण्यात येत आहे. खंडाळा-बावडा येथील ब्रिलियंट इंग्लिश मिडीयम स्कूलने संविधान गुण गौरव परीक्षेसाठी सहभाग घेतलेला असून विद्यार्थ्यांनीच नव्हे तर शाळेच्या प्रमूखांसह शिक्षकवृंद यांनी सुद्धा अर्ज भरून नोंदणी केली. या सहभागाबद्दल संविधान गुण गौरव समितीच्या वतीने सर्वच सहभागी परीक्षार्थीचे विशेष कौतुक केले जात आहे. संविधान गुणगौरव समितीचे मार्गदर्शक नूरखाँ पठाण यांनी लिहिलेल्या "आपले संविधान... राज्यपद्धती नव्हे तर जीवनपध्दती" या पुस्तकावर आधारित संविधानाच्या संबंधित असलेल्या परीक्षेचे आयोजन करण्यात आलेले आहे.ब्रिलीयंट इंग्लिश मिडियम स्कूलचे २८ विद्यार्थी आणि शाळेच्या प्रमुखांसह १४ शिक्षकवृंद असे एकूण ४२ परीक्षार्थींनी या परीक्षेत सहभाग घेतला आहे. संस्थेचे उपाध्यक्ष जयकुमार खरात, सचिव स्नेहल खरात, उपप्राचार्या स्वाती ढमाळ, उपशिक्षिका संध्या मोरे,रुपाली ढमाळ, रेश्मा भोसले, नाजनिन पटेल, मिनल गाढवे, पूजा पडगिलवार,माधुरी बडदे, उषा पवार, वैष्णवी पवार, सागर घाडगे, अक्षयकुमार पवार आदीं शिक्षकवृंद यांनी परीक्षेत सहभाग घेतलेला आहे. तसेच इयत्ता सहावीतील सई कदम, स्वरा जगताप, पूर्वी गुठाळे, गुरुप्रसाद येल्लापुरे, इयत्ता सातवीतील पार्थ ढमाळ, नंदिनी भोसले, प्रणाली माळी, सुहाना शेख, जान्हवी  जाधव, स्वरा खंडागळे, गायत्री यादव, वेदांतीका यादव, आफिया शेख, आर्यन यादव, इयत्ता आठवीतील निकीता गोगी, यशश्री गोळे, आयुषी यादव,वरुण भोसले, अभिनव ढमाळ, साईप्रेम गुरव, प्रदयुम्न देशमुख,सोहम गाढवे, शिवम किंद्रे, इयत्ता नववीतील सार्थक शिंदे, विवेक खंडागळे, चैताली कदम, तनुश्री येल्लापुरे,  श्रवण गाढवे आदी विद्यार्थ्यांनी परीक्षेचा अर्ज भरून प्रवेश घेतला. सर्व परीक्षार्थी यांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया संविधान गुण गौरव समितीचे सदस्य सुशिल गायकवाड यांनी पार पाडली. या सहभागाबद्दल संविधान गुण गौरव समितीचे अध्यक्ष विलास पवार, उपाध्यक्ष शबनम पठाण, मार्गदर्शक नुरखाँ पठाण, सदस्य अझहर शहा, नितीन घोपे, दिपरत्न निलंगेकर,युवराज खोब्रागडे, किशोर चव्हाण, सुशिल गायकवाड आदीनी सर्वांचे अभिनंदन केले.

# मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त कृषि विभागामार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** शहरातील मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त कृषि विभागामार्फत तालुका कृषि अधिकारी मदन शिसोदिया यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले यात जंगलातांडा, सावरखेडा, किन्ही, पळाशी, जवळा, पळसखेडा, धनवट, हिवरी, मुखेड, फर्दापूर, जंगलीकोठा या गावात  फेरोमन ट्रॉप व निविष्ठा वाटप, शेततळे उदघाटन, फळबाग उदघाटन, यांत्रिकीकरण उदघाटन, किड व रोग विषयी जनजागृती व मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी प्रत्येक गावात वेगवेगळे कार्यक्रम घेण्यात आले यात तालुका कृषि अधिकारी मदन शिसोदिया, मंडळ कृषि अधिकारी संपत वाघ, रमेश गुंडीले, कृषि पर्यवेक्षक समाधान चौधरी, अतुल पाटील, प्रदीप पाटील, किशोर महाजन, बिटीएम अमोल महाजन कृषि सहाय्यक अर्जुन सुरडकर, मानसिंग भोळे, बेबीचंद चौरे, आरती बावस्कर, सरला चव्हाण, कविता अहिरराव, विश्वजित तायडे, राधिका साळुंखे, ललिता साळवे, भाग्यश्री वायकर, जयश्री वाघ, शेतकरी उपस्थित होते.



# आजी-आजोबा, नातवंडांचा रंगला स्नेहसोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**सागर झनके**

**जळगाव जा :** नातवंडांचे पहिले मित्र म्हणजे आजी आणि आजोबा आणि आजी आजोबांसाठी नातवंडं म्हणजे त्यांचा जीव की प्राण... पण विभक्त कुटुंबपद्धती मुळे आजकाल आजी आजोबा मुलांपासून दुरावल्याचं चित्र उभे राहत आहे. याला छेद देण्यासाठी  शासनाने सर्व शाळांमध्ये 'आजी आजोबा दिवस' साजरा करण्याचे ठरवले. त्या अनुषंगाने आज दिनांक 12/9/ 2023 रोजी. जि. प. म. उ.प्राथमिक शाळा झाडेगाव येथे 'एक दिवस आजी-आजोबांसाठी' हा उपक्रम राबवण्यात आला. कार्यक्रमाला आजी-आजोबांची लाक्षणीय उपस्थितीत दिसून आली. शाळेतील नातवंडांनी आपापल्या आजी-आजोबांचे पूजन करून त्यांचे आशीर्वाद घेतले. नातवंडांसाठी तर त्यांच्या ह्रदयाच्या कोपऱ्या कोपऱ्यातून नेहमी आशीर्वादच निघतात. आपल्या नातवांचे आपल्याप्रति असलेले प्रेम पाहून तर त्यांचाही उर भरून आला. त्यांच्या चेहऱ्यावरचा तो आनंद कुठल्याही शब्दात व्यक्त करता येणार नाही. नातवंडांसाठी तर ते नेहमी कोणाशी भांडायला तयार होतात पण आज ते त्यांच्यासाठी



लहानांहून लहान झाले. भोवरा,विटी दांडू,संगीत खुर्ची इ. खेळांमध्ये त्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. नातवंडांनीही आपल्या आजी-आजोबांचा उत्साह वाढवून त्यांच्या प्रति असलेले आपले प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त केली. मुलांवर चांगले संस्कार करायचे असतील, त्यांच्यामध्ये नैतिक मूल्ये रुजवायची असतील तर आजी आजोबा हवेच. दिवसेंदिवस कमी होत चाललेल्या माणुसकीला आजी आजोबांशिवाय पर्याय नाही.

# नागपुरात रेल्वेच्या धडकेत बिबट्याचा जागीच मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** खापरखेडा-कोराडी रेल्वे रुळावर रेल्वेगाडीच्या धडकेत एका बिबट्याचा मृत्यू झाला. रेल्वे कर्मचाऱ्यांनी तातडीने स्थानिक पोलीस आणि वनविभागाला त्याची सूचना दिली. विकास प्रकल्पांचा फटका वन्यप्राण्यांना नेहमीच बसत आला आहे. अशा प्रकल्पांच्या ठिकाणी बरेचदा वन्यप्राण्यांसाठी ‘मेटीगेशन मेजर्स’ घेतले जात नाही. ते घेतले तरी त्यात त्रुटी असतात. परिणामी वन्यप्राण्यांचा यात बळी जातो. सोमवारी सकाळी घडलेली ही घटना शहराच्या जवळपास घडली. रेल्वेची धडक इतकी जबरदस्त होती की बिबट्याचे शरीर दोन भागात विभागल्यासारखे दिसून येत होते.

## मराठा, ओबीसीनंतर धनगर समाज आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** ओबीसी समाजाने मराठा समाजाला कुणीबी समाजाचे प्रमाणपत्र देण्याला विरोधासाठी राज्यात आंदोलन उभारले. यात आता धनगर आरक्षण आणि समाजाच्या विविध मागण्यांवर चर्चेसाठी बैठकीचे आयोजन करावे, अशा मागणीचे निवेदन आमदार गोपीचंद पडळकर यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना पाठवले आहे. धनगर आरक्षणाकरिता उच्च न्यायालयात दाखल याचिकेत ॲड. कुंभकोणी यांची कायम नियुक्ती करणे, तसेच न्यायालयात तत्काळ व दैनंदिन सुनावणीकरता सरकारतर्फे अर्ज दाखल करणे, 'जे आदिवासींना ते धनगरांना' यांप्रमाणे घोषित केलेल्या एक हजार कोटी रुपयांच्या २२ योजनांपैकी काही योजना प्रभावीपणे राबवल्या गेल्या नाहीत व संपूर्ण निधीसुद्धा उपलब्ध झाला नाही. त्याबाबत आढावा घेऊन उपायोजना करणे, मेंढपाळांवर होत असलेले हल्ले रोखणे व त्यावर 'स्वतंत्र कायदा' आणून त्यांना संरक्षण देणे, आरेवाडीच्या बिरोबा मंदिर देवस्थानाच्या सुशोभिकरणासाठी २०० कोटींचा निधी द्यावा, अहमदनगर जिल्ह्याच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी नगर' नामांतरासाठी प्रयत्न व अंमलबजावणीसाठी तातडीने कारवाई करण्याचे निर्देश द्यावे अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

# हैदराबाद मुक्तिसंग्राम दिन उत्साहात साजरा

## मुक्तिसंग्राम दिवस नागरिकांसाठी स्वातंत्र्याचा सोहळा : हंसराज अहीर

आधुनिक केसरी न्यूज

**जिवती / कोरपना :** मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या वर्धापन सोहळा निमित्त दि. 17 सप्टेंबर रोजी राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी जिवती व कोरपना येथे ध्वजारोहण करून उपस्थित नागरीकांना हैद्राबाद मुक्ती संग्राम दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या शुभप्रसंगी नागरीकांना मार्गदर्शन करतांना त्यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामात स्वतंत्र भारताचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या योगदानाचे स्मरण करीत त्यांच्या कणखर भूमिकेमुळे आपणास निजाम स्टेटमधून मुक्तता लाभली म्हणून हा आपणा सर्वांसाठी स्वातंत्र्य दिवस व आनंददायी सोहळा असल्याचे अहीर यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगीतले. प्रारंभी



जिवती येथील छत्रपती शिवाजी महाराज व पुज्यनिय रामराव महाराजांच्या पुतळ्यांना माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. जिवती येथील मंदीराच्या पटांगणात आयोजित या कार्यक्रमास माजी आमदार संजय धोटे, माजी आमदार सुदर्शन निमकर, खुशाल बोंडे, देवराव भोंगळे, राजु घरोटे, गिरमाजी, सुरेश केंद्रे, महेश देवकेते, गोदावरी केंद्रे, दत्ता राठोड यांचेसह भाजप पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. कोरपना येथील श्रीकृष्ण सभागृहात पार पडलेल्या मुक्तीसंग्राम दिनाच्या सोहळ्यास भाजपा तालुकाध्यक्ष नारायण हिवरकर, रमेश मालेकर, किशोर बावणे, शिवाजी सेलोकर, पुरूषोत्तम भोंगळे, सतिश उपलेंचवार, निलेश ताजने, महादेव एकरे, अरूण मडावी, संजय मुसळे, अमोल आसेकर, विशाल गज्जलवार, राहुल सुर्यवंशी आदींची उपस्थिती होती. यावेळी मा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त उपस्थितांनी शुभेच्छा दिल्या. विश्वकर्मा जयंती दिनी लोकार्पित प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेमुळे ग्रामिण कारागीरांचे उत्थान होतानाच ओबीसींच्या प्रगतीमध्ये सुध्दा भर पडेल असे अहीर यांनी सागीतले. याप्रसंगी कारागीरांचा अहीर व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. दोन्ही ठिकाणी प्रधानमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना नोटबूक व खाऊचे वितरण करण्यात आले.



# समाजसेवक मनोज पवार यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा

## शहरातील विकासकामासाठी नेहमी कटिबद्ध राहील : मनोज पवार

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** वाढदिवस म्हटलं की आनंदाचा दिवस पण तो आनंद आपण दुसऱ्याच्या चेहऱ्यावर परावर्तीत करु शकलो तर व्दिगुणित होतो. म्हणूनच माझ्या वाढदिवशी सामाजिक उपक्रम राबवून आपल्या आनंदात सर्वांना सहभागी करुन घेण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे. शहराच्या विकासासाठी मी सदैव निस्वार्थ भावनेने समाजसेवा करत राहणार आहे. असे प्रतिपादन उद्योजक तथा समाजसेवक मनोज पवार यांनी केले. शहरातील उद्योजक तथा लोकप्रिय समाजसेवक मनोज केशवराव पवार यांचा वाढदिवस त्यांच्या मित्रपरिवाराने, युवकांनी व प्रतिष्ठित नागरिकांनी शुक्रवारी (दि.१५) सप्टेंबर रोजी मोठ्या उत्साहात साजरा केला. उद्योजक मनोज पवार मित्र मंडळ,कन्नड परिवाराने सामाजिक उपक्रम राबवत अनोखा संदेश यातून दिला. शहरातील विविध प्रभागात त्यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना समाजसेवक मनोज पवार म्हणाले की, माझ्या आई-वडिलांनी दिलेली समाजसेवेची शिकवण घेत मी सर्वसामान्यांची कामे करण्यासाठी व त्यांना मदत मिळवून देण्यासाठी माझ्या मनात नेहमी धडपड असते. सामाजिक कामे करण्यासाठी मला आपल्या सर्वांकडून ऊर्जा मिळते तसेच यात केवळ माझे श्रेय नाही तर माझी पत्नी उद्योजिका तथा समाजसेविका उर्मिला पवार व पवार कुटुंबियांवर प्रेम करणारे शहरातील नागरिक, प्रतिष्ठित नागरिक, युवक व मनोज पवार मित्र मंडळातील सदस्यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांच्या अथक परिश्रमाशिवाय हा कार्यक्रम होणे केवळ अशक्य असल्याचे असेही ते म्हणाले. मनोज पवार यांच्या वाढदिवसाची सुरुवात शहरात शुक्रवारी सकाळपासूनच सुरू झाली होती. सर्वप्रथम शहरातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्याला अभिवादन करून समाजसेवक मनोज पवार यांच्या हस्ते जल, दुग्धाभिषेक करण्यात आले. तसेच शहरातील स्वामी समर्थ केंद्र, शनी मंदिर व प्रसिद्ध असलेले हजरत सिद्दिक शाह बाबा यांच्या दर्ग्यामध्ये युवा उद्योजक मनोज पवार यांच्या हस्ते चादर चढविण्यात आली. दर्शन घेऊन नागरिकांचे आरोग्य सुखरूप व आनंदी ठेव अशी प्रार्थना त्यांनी केली. मनोज पवार यांना मानणारा मोठा वर्ग आहे. यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून उद्योजक मनोजभाऊ पवार मित्र मंडळाने प्रत्येक प्रभागात विविध कार्यक्रम घेण्यात आले. वाढदिवसानिमित्त समाजातील गरीब, गरजू नागरिकांना मदत, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, पर्यावरण रक्षण, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, पाण्याची टाकी बसविणे, गोरोबा नगर येथे हायमास्ट दिवे लावले यासारखे विविध सामाजिक उपक्रमांनी मनोज पवार यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी हे सर्व उपक्रम उद्योजक मनोजभाऊ पवार मंडळातील सदस्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. या वेळी उदयोजक, व्यापारी, राजकीय नेते, शिक्षक ,डॉक्टर ,वकील ,पत्रकार विविध सामाजीक क्षेत्रातील नागरीकांनी मनोज पवार यांचा वाढदिवस साजरा करून शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी नगरसेवक सुनील पवार, सामाजिक कार्यकर्ते पवन ठाकूर, संदीप नरवडे, संगेश भारूका, सोपान शिरसाट, अशोक वाहुळ, आकाश बोलधने, मनोज देशमुख, केतन त्रिभुवन, शहबाज बागवान, संदेश पवार, रुपेश भारूका, सोमनाथ दाभाडे, दीपक कुमावत, प्रवीण घाडगे, महेश सोनवणे, शंकर राऊत, दर्शन देशमुख, आदित्य देशमुख, संदीप घोगटे, बंटी जाधव, सतीश खिल्लारे, प्रकाश शिरसे, योगेश त्रिभुवन, दीपक घाडगे, नौशाद पटेल, मोईन पटेल, मजहर पठाण, अभिषेक पवार आदींनी अथक परिश्रम घेतले. यावेळी समीर शेख, रफिक शेख, कांतीलाल महासरे, सोमनाथ महासरे, नंदू मोरे, गणेश मोरे, विजू मोरे, दौलत म्हसरे, सोनू ठाकरे, सचिन मोरे, शिवाजी मोरे, राजू महासरे, संतोष मोरे, अरुण म्हसरे, श्रावण महासरे, संदीप मोरे, आकाश महासरे, सागर गोरे, गणेश चव्हाण, मनीषा मोरे, रत्नाबाई महासरे, मीनाबाई मोरे, लताबाई झोडगे, विठाबाई मोरे, सलमा सय्यद, शोभा महासरे, शेख सत्तार, जावेद पठाण, अहेमद शेख, इम्रान शेख, मंगलबाई सोनवणे, सावित्राबाई राऊत, शमिना शेख, सविता गायकवाड, सुंनंदा ठाकरे, अलकाबाई काळे, राजेश जहागीड, कडुबा वाघ, मंजूर शेख,सुम्म्या शेख, पूजा काकूळते, मनीषा राऊत, अनिसा पठाण, अनिता गायकवाड, कडुबा गायकवाड, अलका वाकळे त्यांच्यासह शहरातील विविध प्रभागातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## महामार्ग पोलिसांची अपघातस्थळी तत्परता

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** जिंतूर ते औंढा रोडवर 17 सप्टेंबर रोजी लिंबाळा पाटीजवळ संभाजीनगरहून सुकळी तालुका वसमत जिल्हा हिंगोलीकडे जाणारा टेम्पो क्रमांक टेम्पो क्र.26 ए डी 58 12 /407 या टेम्पोला अज्ञात वाहनाने कट मारल्याने सदरचे वाहन रस्त्याच्या बाजूला केल्याने पलटी झालेची माहिती मिळताच जिंतूर महामार्ग पोलिसांना अपघातांची माहिती मिळताच स.पो. नि. जाधव व  गिराम महामार्ग पोलीस असे अपघात स्थळी तात्काळ पोहोचवून  सदर अपघातामध्ये जखमी इसम 1)सविता वय 40 वर्षे 2)बाळू नरवाडे वय 50 वर्षे 3)शांताबाई नरवाडे वय 35 वर्षे4)अरुणा नरवाडे वय 40 वर्षे सदरील महिला व पुरुष जखमी झाले असून त्यांना ॲम्बुलन्सच्या मदतीने शासकीय रुग्णालय जिंतूर येथे उपचारार्थ दाखल केले



आहे.तसेच
सदर अपघातात किरकोळ मुका मार लागलेले इसम नामे 1)मोतीराम धनवे वय 50 वर्षे 2) कमलाबाई इंगोले वय 40 वर्षे 3)वैशालीताई वय 45 वर्षे 4)पंचशील नरवाडे वय 50 वर्षे 5)वंदना नरवाडे 51 वर्षे यांना यांना सरकारी दवाखाना जिंतूर येथे शरीक केले असून सदर अपघातातील टेम्पो  हा बाजूला घेऊन वाहतूक सुरळीत केली आहे.



## संभाजी ब्रिगेडचे तहसीलदारांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** खंडाळा तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात बाबत खंडाळा तालुका संभाजी ब्रिगेडच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.यावेळी निवेदन देण्यासाठी संभाजी ब्रिगेडचे खंडाळा तालूकाध्यक्ष संतोष मालुसरे, उपाध्यक्ष शौकत शेख, शिरवळ शहराध्यक्ष सुजित दगडे, लोकेश चव्हाण, सिध्देश्वर भरगुडे आदी उपस्थित होते. दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की,खंडाळा तालुक्यात पीक पावसाअभावी डोळ्या देखत करपून जात आहे. दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे.पावसाळा सुरू होऊन तीन महिने उलटले तरी अद्याप अपेक्षेप्रमाणे पाऊस नसल्याने खरिपाची पिके वाया गेली आहेत. पावसाच्या भरवशावर शेतकरी यांनी सोयाबीन, कांदा, मका, बाजरी, भुईमूग आदी कडधान्याची पेरणी केली होती. पावसाने हुलकावणी दिल्याने आदी पिके जळाली आहेत. मुलांचे शिक्षण, लग्न आदी कामे करणेही शक्य होणार नाही.कुटुंबाचा उदरनिर्वाह करणेदेखील कठीण होणार आहे. त्यामुळे त्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने लवकरात लवकर दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी निवेदनातून केली आहे.

# मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या अमृत महोत्सवानिमित्त आजी-आजोबांचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपळगाव वळण :** फुलंब्री तालुक्यातील पिंपळगाव वळण, मतेवाडी फाटा येथील आदर्श प्राथमिक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक तसेच ग्रामगिता माध्यमिक विद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन अमृत महोत्सवानिमित्त स्वच्छ्ता मोहीम, रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, मराठवाडा गीत, प्रभात फेरी, भाषण स्पर्धा, संगीत, नृत्य,चित्रकला तसेच महत्वाचा म्हणजे आजोबा - आजी दिवस सुद्धा शाळेमध्ये साजरा करण्यात आला. विशेष म्हणजे आजोबा आजी समोर विद्यार्थ्यांनी विवध कलाकृती यावेळी साजरी केली. शाळेचे अध्यक्ष तथा शेतकरी संघटनेचे जिल्हा अध्यक्ष काशिनाथ जाधव तसेच शाळेचा संचालिका लताबाई जाधव यांचा हस्ते आजोबा आजीचा सन्मान या वेळी करण्यात आला. कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी सुभाष पांचाळ यांची उपस्थिती होती. आजोबा आजी यांनी यावेळी आपले नातवाबरोबर कसा वेळ घालवता त्यांनी आपल्या मनोगता मधून व्यक्त केले. यावेळी राधाबाई लगड, त्रिंबक लगड, शांताबाई जाधव, यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी मुख्यध्यापिका अश्विनी जाधव, मुख्याध्यापक योगेश जाधव यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष काशिनाथ जाधव यांनी बोलताना सांगितले की शासनाच्या विविध परिपत्रकानुसार शाळेमध्ये विविध उपक्रम राबवून विद्यार्थी पालक यांना विश्वासात घेऊन विद्यार्थ्यांचे शिक्षणासोबतच दैनंदिन घडामोडींचे उपक्रम त्यांना कळावे त्यासाठी शिक्षणाबरोबर सामाजिक, शैक्षणिक, खेळवृत्ती व विविध स्पर्धेचे शिक्षण आम्ही देत असतो.



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहसिक्षक परासराम घुगे यांनी केले. प्रस्ताविक सहसिक्षक अनिल थोराततर आभार निता ठाकूर यांनी मानले. कार्यक्रमासाठी सहशिक्षक सचिन निर्मळ, अन्सार शेख,अनिल गायकवाड, संदीप निर्धोनकर, सहशिक्षिका सविता लांडगे, वैशाली तायडे, पुष्पा काकडे वर्षा वहाटुळे,जिवन पवार, भाऊसाहेब शिरसाट, आकाश म्हस्के,राजू गायकवाड,राजू होंनमाळी,आदी सह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले.

# भैय्यासाहेब आंबेडकरांनी समता प्रस्थापित करण्यासाठी लढा दिला : प्रा. भारत शिरसाट

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** भैय्यासाहेब आंबेडकरांनी समता प्रस्थापित करण्यासाठी लढा दिला. समाजाला समतेच्या मार्गावर आणण्याचे काम भैयासाहेब आंबेडकरांनी केले. असे प्रतिपादन प्रा. भारत शिरसाट यांनी केले. भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. ते पुढे म्हणाले की, भैय्यासाहेब धम्म चळवळीचे काम करत. आमदार असताना गावोगावी तालुक्यात पायी फिरत होते. असा एक जिल्हा नाही, किंवा असा एक तालुका नाही,ज्या ठिकाणी भैय्यासाहेब पोहोचले नाही. बुद्ध धम्म स्वीकारल्यानंतर बौद्धांना सवलती का दिल्या जात नाही, असा सवाल पंतप्रधान मोरारजी भाईना भैयासाहेब आंबेडकरांनी विचारला होता. त्यावर तुम्हाला बौद्ध होण्यासाठी कोणी सांगितले? असा प्रश्न मोरारजी भाईंनी केला असता, तुझ्या बापाने आम्हाला बुद्ध होण्यास सांगितले, असे सडेतोड उत्तर भैय्यासाहेब आंबेडकरांनी दिले होते. असेही ते म्हणाले. भीम ज्योत यात्रा काढून एक,एक रुपया वर्गणी करून चैत्यभूमीची जागा त्यांनी विकत घेतली. त्या वेळच्या मुख्यमंत्र्यांनी बाबासाहेबांच्या अंत्यविधीसाठी,बाबासाहेबांच्या



स्मारकासाठी जागा नाकारली होती. आठ बाय आठची जागा महानगरपालिकेने देउ केली होती. भारताचे संविधान लिहिणाऱ्या महामानवाला स्मारकासाठी जागा मिळत नाही, यापेक्षा दुर्दैव काय? अशी खंत देखील त्यानी व्यक्त केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी राजगृह विद्यार्थ्यांना राहण्यासाठी दिले होते. भैय्या साहेबांना राहण्यासाठी स्वतःचे घर देखील नव्हते. भैय्यासाहेब खारघरला भाड्याच्या खोलीत राहिले. तिथेही समाजघटकांनी भैय्यासाहेबांच्या घरावर दगड फेकून दहशत निर्माण केली. भैया साहेबांनी मुंबईत राहूच नये. असा त्या काळच्या पुढाऱ्यांचा मनसुभा होता. समाजकंटकानी भैय्यासाहेबांना बदनाम केलं. त्यांच्या कार्याचा उहापोह कधी होऊ दिला नाही. भैयासाहेबांना समाजकंटकानी खूप त्रास दिला. भैय्यासाहेबांनी धम्माचं काम करत असताना गाव तिथे धम्म समारंभ अभियान घेतले. जनतेला बौद्धधम्म पटवून दिला. बाबासाहेबा नंतर ज्या ज्या जबाबदाऱ्या भैय्या साहेबांसमोर आल्या त्या जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे पेलल्या. हे सत्य वास्तव, पुढाऱ्यांनी कधी समोर येऊ दिलं नाही. असेही ते म्हणाले. हा कार्यक्रम सत्यशोधक च्या कार्यालयामध्ये एन ३ सिडको येथे घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अँड. के.ई हरिदास हे होते. यावेळी त्यांनी देखील आपले विचार मांडले. प्रमुख पाहुणे म्हणून अँड.महेश निनाळे, स. सो. खंडाळकर, रतनकुमार साळवे हे होते. या कार्यक्रमाला गायकवाड एम.के, रामदास अभ्यंकर, सविता अभ्यंकर, सावित्री चिताडे, पंचशीला हरिदास, प्रभाकर आरसूड, अंबादास रगडे, प्रा. नवनाथ गोरे, वसुधा कल्याणकर, सिद्धार्थ दाभाडे,अविनाश अंकुशराव, भीमराव गाडेकर यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रतन कुमार साळवे यांनी केले तर सूत्रसंचालन मधुकर खिल्लारे यांनी केले, आभार प्रा. अविनाश अंकुशराव यानी मानले.

# वाकी येथे सत्यशोधक संवाद सभेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** वाकी, ता. बारामती येथे सत्यशोधक समाज स्थापना दिवस शतकोत्तर सुवर्ण महोत्सव दिना निमित्त 'सत्यशोधक कार्यकर्ता निर्माण अभियान अंतर्गत' सत्यशोधक संवाद सभेचे आयोजन रविवार दि. २४ सप्टेंबर रोजी सायं ५:०० वाजता करण्यात आले आहे.राष्ट्रपिता जोतीराव फुले यांचा सत्यशोधकी विचार जनमानसात घेऊन जाण्याचे काम सत्यशोधक बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने गेली अनेक वर्षांपासून केले जात आहे.सत्यशोधक संवाद सभेच्या माध्यमातून लोकांशी एक सामाजिक मंथन घडवून आणली जात आहे.सत्यशोधक समाज स्थापनेचे ध्येय,उद्देश,सत्यशोधक चळवळीचा इतिहास,वर्तमान आणि भविष्यकालीन संकल्पना,उपक्रम आदी विषयांवर सविस्तरपणे संवाद होणार आहे.या संवाद सभेसाठी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सत्यशोधक बहुउद्देशीय सामाजिक संस्था महा.राज्यचे संस्थापक अध्यक्ष व स्वराज्याचा जाहीरनामाचे मुख्य संपादक विशाल धेंडे हे असणार आहेत. प्रमुख उपस्थिती म्हणून ग्रामपंचायत वाकीचे सरपंच किसन बोडरे, उपसरपंच हनुमंत जगताप,सेवानिवृत्त आर.टी.ओ. अधिकारी व शांतता कमिटी सातारचे सदस्य डॉ.मधुकर वाघमारे, जर्नालिस्ट हर्षद रुपवते, प्रा.संदीप लोखंडे,संजीव संरक्षण आणि जागृतीचे संस्थापक अध्यक्ष भालचंद्र महाडीक,स्वराज्याचा जाहीरनामाचे उप संपादक संभू कांबळे आदी उपस्थित असणार आहेत. कार्यक्रमाचे आयोजक सेवानिवृत्त मुख्याध्यापक व पुरोगामी लेखक अरविंद जगताप आणि सेवानिवृत्त पोलिस उपनिरीक्षक,महाराष्ट्र पोलीस गुप्त वार्ता प्रबोधिनी / स्वराज्याचा जाहीरनामा कार्यकारी संपादक सुरेश गायकवाड हे आहेत.



# हैद्राबाद मुक्तिसंग्राम हा हिंदू विरुद्ध मुस्लीम असा नव्हता : डॉ. रश्मी बोरीकर

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** हैद्राबाद संस्थानातून मराठवाड्याला मुक्त होऊन झाली, काही लोक जाणीवपूर्वक खोटा इतिहास सांगुन त्यास हिंदु विरुद्ध मुस्लीम असा रंग देण्याचा केविलवाणा प्रयत्न करतात, तो लढा जुलमी निजामाविरोधात होता. त्या स्वातंत्र्य लढ्यात हिंदु, मुस्लीम, बौद्ध सर्व जाती धर्माचे लोक सहभागी झाले होते, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या डॉ रश्मी बोरीकर यांनी केले भारतीय कम्युनिस्ट पक्ष कार्यालय खोकडपुरा येथे डॉ बोरीकर त्यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. झेंडावंदना नंतर उपस्थितांना संबोधित करतांना त्या बोलत होत्या. हजारो कोटींच्या घोषणा पुर्वीही झालेल्या, कालही झाल्या परंतु जमीनीवर काहीही बदल दिसत नाही, मराठवाड्याचे हक्काचे पाणी, रोजगार, विकास होतांना दिसत नाही, यासाठी आपण जागरुक नागरिक व्हायला हवे असेही आवाहन त्यांनी केले. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या ( शरद पवार ) महासचिव सुशिला मोराळे या देखील यावेळी उपस्थित होत्या. प्राताविकात ॲड अभय टाकसाळ म्हणाले की, भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात फक्त ब्रिटीश राजवटी विरुध्द नव्हे तर गोव्यातील पोर्तूगीज, पुडूचेरी व इतरत्र फ्रेंच व मराठवाड्यावर निजामासह इतरत्र 571 संस्थानिकांविरुद्धही लोकशाही स्वातंत्र्यासाठी संघर्ष झाला. या संघर्षात भारतीय कम्यूनिस्ट पक्षाने महत्त्वाची भूमिका बजावली होती. जाणीवपूर्वक हैद्राबाद मुक्तीसंग्रामाला धर्मांध रंग देण्याचा प्रयत्न काही लोक करतात. या लढ्यात कॉ. हबीबोद्दीन, कॉ. इफ्तेकार, कॉ. नसीम, कॉ. सय्यद मखदूम, कॉ. असदभाई, कॉ. मखदूम मोयीनोद्दीन, आलम खुदमिरी, गुलाम हैदर, जावेद रझवी, आलम खुंडमिरी, सय्यद इब्राहीम, हसन अली मिजी, काजी अब्दुल गफ्फार, मिर्जा हैदर हुसेन, शहाबुद्दीन, लेखक अख्तर हुसेन, सादीक सिद्धीकी, आबीद अलीखान, महेबुव हुसेन जिगर, मयकेश हैद्राबादी, जफरून हसन, लतीफ साजीत इत्यादी अनेक मुस्लीम धर्मात जन्माला आलेले तसेच कॉ. व्ही. डी. देशपांडे, कॉ. चद्रगुप्त चौधरी, कॉ. करणाभाभी चौधरी, रतिलाल जरीवाला, कॉ. माणिकभाई कापडीया, गोविंदभाई श्रॉफ, आ. कृ. वाघमारे, कॉ. गंगाधर अप्पा बुरांडे, कॉ. वंदन राक्षसभूवनकर, कॉ. आर. डी. देशपांडे, कॉ. गोपाळराव कुर्तडीकर, कॉ. विरेंद्र शिंदे, कॉ. गंगाधर चिटणीस, कॉ. मनोहर टाकसाळ, कॉ. काशिनाथराव जाधव, कॉ. रामभाऊ फटांगडे, कॉ. रामराव गायकवाड त्याच बरोबर ब्रिजरानी, यशोदाबेन, विमल मेलकोटे, उषा पाग्रीकर, अहिल्या सरजूबाई, सौ. नांदापूरकर, प्रभा नायडु, रत्नाकर कमलम्मा, सुमित्राबाई, तायबाई, चंदाबेन जरीवाला यासारख्या असंख्य महिलांनी निजाविरोधातील लढ्यात सहभाग घेतला. निजामाला महसुल दैणारी 25 लाख पामची झाड कापुन दलीतांनी ( जंगल सत्यागृह ) अनोख्या पद्धतीने निजामाला जेरीस आणले.

यावेळी ॲड सागरदास मोरे,ॲड. कॉ. अभय टाकसाळ, शहर सेक्रेटरी, कॉ. अनिता हिवराळे, शहर सह सेक्रेटरी कॉ.मनिषा भोळे, शाखा सेक्रेटरी, कॉ.राजू हिवराळे, कॉ.निता किर्तीशाही, कॉ.रफिक बक्श, सुरेश बेलकर, विकास गायकवाड, माधुरी जमधडे, उषा सातपुते, पुष्पा बिरारे, कविता होरशिळ, अर्चना घाटे, गौतम कांबळे, अमरजीत बाहेती, बबन बुरकुल, ॲड. अयास शेख, साबिया सलामी, बाबुलाल वाघ, विशाल बोर्‍हाडे, कविता गायकवाड यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# प्रशासनाच्या नुकसान भरपाई यादीतील अनागोंदी चव्हाट्यावर; शेतकऱ्यांचे उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत खडसे**

**वाशिम :** गेल्या वर्षीच्या अतिवृष्टीने जवळपास सर्वच शेतकऱ्यांच्या पिकांची नासाडी होऊन प्रचंड नुकसान झाले होते. हे ढळढळीत सत्य असताना, मात्र स्थानिक प्रशासनातील कर्मचारी व अधिकाऱ्यांनी केवळ स्वतःच्या आर्थिक हव्यासापोटी सदर पंचनाम्यात दूजाभाव केला असल्याची तक्रार करण्यात आली आहे. परिणामी"गतिमान शासनाच्या " स्तुत्य हेतुला प्रशासनाकडूनच " ब्रेक " लावला जात असल्याचे चित्र समोर येत आहे. याबाबत बाळखेडा येथील शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसले आहेत. त्याअनुषंगाने प्रशासनातील नुकसान भरपाई यादीतील अनागोंदी कारभार चव्हाट्यावर आला असल्याचे बहुतांश शेतकरी बोलत आहेत.

मागील वर्षीच्या पावसाळ्यात अतिवृष्टीने धुमाकूळ घातला होता. याचा विशेषतः सर्वात जास्त फटका सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना बसला. हे ढळढळीत सत्य सर्वश्रुत आहे. याचा शासनाने देखील गांभीर्याने विचार करून नुकसान भरपाईची मदत जाहीर केली होती. त्याअनुषंगाने महसूल प्रशासनाला पंचनामे करण्याचे आदेश सुद्धा दिले होते. मात्र, प्रशासनातील पंचनामे करणाऱ्या यंत्रणेला यातही " मलई " चाटण्याचा मोह अनावर झाला. त्यामुळे नुकसान भरपाई यादीत मोठ्या प्रमाणात अफरा तफर झाली, असल्याची तक्रार उपोषणकर्त्या शेतकऱ्यांनी रिसोड तहसीलदार व जिल्हाधिकारी वाशिम यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. दिलेल्या निवेदनात संबंधित शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, " ज्या शेतकऱ्यांनी त्यांच्या आलेल्या मदतीतून हेक्टरी ५० टक्के रक्कम संबंधित तलाठ्यास देण्याचे कबूल केले, त्यांचे बाधित क्षेत्र जास्त दाखवून त्यांना जास्तीची मदत मिळवून देण्यात आली आहे. परंतु जे खरे नुकसानग्रस्त शेतकरी आहेत त्यांनी सदर तलाठ्यास आर्थिक लाभ देण्याचे नाकारले होते. म्हणून त्यांचे जाणीवपूर्वक बाधित क्षेत्र कमी दाखवून त्यांना शासनाच्या मदतीपासून वंचित ठेवण्यात आले आहे..! " या गंभीर बाबीची शासनाने सखोल चौकशी करावी. व संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी. तद्वतच, ऑक्टोबर २०२२ च्या अतिवृष्टी यादीचा पुन्हा पंचनामा करून अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा..! अन्यथा आमचे उपोषण सुरूच राहील. असा इशारा देखील उपोषणकर्त्या शेतकऱ्यांनी दिला आहे. दिलेल्या निवेदनावर अन्यायग्रस्त शेतकरी रामेश्वर बोडखे, ज्ञानेश्वर सोनुने, परमेश्वर पऱ्हाड, विलास तायडे, दीपक सोनुने आदींच्या स्वाक्षऱ्या असून, सदर शेतकरी जिल्हाअधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसले आहेत. त्यामुळे, प्रशासनाच्या नुकसान भरपाई यादीतील अनागोंदी कारभार चव्हाट्यावर आला असल्याचे सर्वसामान्य नागरिक बोलत आहेत.






# भैय्यासाहेब आंबेडकरांना अभिवादन, मानवंदना

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सूर्यपूत्र भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त जवळा देशमुख येथील समता सैनिक दलाच्या वतीने भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले आणि समता सैनिक दलाच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येत मानवंदना दिली. सरपंच कमलताई शिखरे, साहेबराव शिखरे, प्रमुख मार्गदर्शक गंगाधर ढवळे, वसंत गोडबोले, पांडूरंग गोडबोले, पुरभाजी गोडबोले, सुलोचना गच्चे, मनिषा गच्चे, सारीका गच्चे, सूरज गोडबोले, सन्मान गच्चे, साहेब गच्चे आदींची उपस्थिती होती. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त जवळा देशमुख येथील विश्वशांती बौद्ध विहारात अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# हजरत पीर गैबनशहावली बाबांचा उरुस उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शहरात हजरत पीर गैबनशहावली बाबा पीर पटांगण सॅंदल शरीफ २७ वा उरूस दिनांक 15 सप्टेंबर रोजी उत्साहत साजरा करण्यात आला. यावेळी हिंदू व मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. २ ते ३ हजार हिंदू व मुस्लिम बांधवांनी येथे महाप्रसादाचा देखील या ठिकाणी लाभ घेतला. हा उरूस हिंदू आणि मुस्लिम एकतेचे प्रतिक आहे. सातशे वर्षपूर्वीची हजरत पीर गैबनशहावली बाबांची दर्गा असून आम्ही २७ वर्षांपासून बाबाजींचा संदल काशिनाथ वाघ यांच्या घरातून दरवर्षी प्रमाणे संदल मिरवणूक काढण्याची परंपरा आहे या मिरवणुकीत सर्व समाज धर्माचे लोक सहभागी होतात.

हजरत गैबनशहावली बाबा यांचा संदल बाबांच्या समाधीवर चढतो अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात हा उत्सव साजरा करण्यात आला .

महाप्रसादाचा लाभ देखील सर्व उपस्थित भक्तजनांनी या ठिकाणी घेतला आणि दरवर्षी प्रमाणे २ ते ३ हजार भक्त परिवार या ठिकाणी उपस्थित होते. यावेळी सय्यद वाजेद बाबा,सय्यद नवाज, सय्यद जावेद सय्यद अजीज, सय्यद हामीद, दानेश, ऋषिकेश ढंगारे, सुभाष लक्ष्मन ढंगारे, काशिनाथ वाघ, संतोष वाघ, ज्ञानेश्वर सोनवणे, अविनाश लिंगायत, भरत अग्रवाल, सय्यद जफर, सय्यद गुड्डू, सय्यद जहीर, सय्यद शोहेब, सय्यद शौकत, इबाद कुरेशी, समीर पठान, जावेद पठाण,



इम्रान पठाण, शिब्बू शेख, अकबर शहा, अल्ताफ पटेल, इम्रान खान, जुनैत शेख, जाकीर पटेल,संजू जानराव, शेषराव वाघ, प्रकाश वाघ, राजू जानराव, कडुबा जानराव, गजू जानराव, मैनाजी जानराव, राजू नागरे, सचिन देवमाळी, कैलास रघु, सुनील रघु, शेखू रघु, रवी रघु, दिलीप रघु, बारकू वाघ, सखाराम वाघ, काबूशेठ वाघ, हरी वाघ, नारायण वाघ, आकाश गंगावणे, रमेश गंगावणे, बाळू गंगावणे, किरण गंगावणे, बंटी गंगावणे, सुनील गडवे, अशोक वाघ, गौरव गुरुजी,प्रदीप गुरुजी, गौरव सराफ, श्याम गुरुजी, मनोज जैस्वाल, गजू संकपाल ओमकार गुंजाळ, ऋतिक बेराड, चैतन्य लहाने, आदित्य सोळुंके, प्रशांत घुगे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

# सोशल मीडियात रंगलाय श्रेय घेण्यावरून राजकीय कार्यकर्त्यांत कलगीतुरा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** यंदा गंगापूर-खुलताबाद मतदार संघाची निवडणूक मोठी चुरशीची होण्याचे चिन्ह दिसत असून एक वर्षापासून मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांनी मतदार संघात मोर्चे बांधणी सुरू केली आहे. आ.चव्हाण यांनी गावोगावी केलेले रस्ते, शाळा खोली दुरुस्ती आणि पेवरच्या ब्लॉक कामांमुळे येथील राजकीय कार्यकर्त्यांमध्ये श्रेय घेण्यावरून चांगलाच कलगीतुरा रंगला असल्याचे सोशल मीडियात दिसून येत आहे. त्यात आम आदमी पक्षानेही चंचू प्रवेश करून कार्यकर्त्यांच्या तोंडचे पाणी पळाले असल्याचे दिसून येते आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की गंगापूर खुलताबाद मतदार संघ हा गेल्या पंधरा वर्षांपासून भारतीय जनता पक्षाच्या ताब्यात आहे. या ठिकाणी आमदार प्रशांत बंब हे प्रतिनिधित्व करत असून गेल्या एक वर्षांपासून मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांनी या मतदारसंघात लक्ष घालण्यास सुरुवात केलेली आहे. त्यातच आमदार सतीश चव्हाण यांनी खुलताबाद तालुक्यासाठी अद्रक संशोधन केंद्र, मतदार संघातील शेतकऱ्यांना २५% अग्रिम पिक विमा, ट्रामा केअर सेंटर आणि डमडम तलावाचा प्रश्न मार्गी लावल्याचे पोस्टरबाजी जोरदार सुरू असतानाच आमदार प्रशांत बंब व त्यांचे समर्थक यांनी दिलेल्या माहितीनुसार ही श्रेय लाटणारी टोळी असून यांच्यापासून सावध रहा असं सोशल मीडियावर आमदार प्रशांत बंब समर्थकांकडून जोरदारपणे प्रचार सुरू आहे.

यामुळे आमदार सतीश चव्हाण आणि आमदार प्रशांत बंब यांचे समर्थकात सोशल मीडियामध्ये चांगलाच कलगीतुरादोन दिवसांपासून रंगला असतांनाच आम आदमी पक्षाचे युवा जिल्हाध्यक्ष सतीश देवेंद्र लोखंडे यांनीही या वादात उडी घेऊन सर्व प्रथम आम आदमी पक्षाने शेतकर्यांना २५% अग्रिम पीक विमा, अतिवृष्टी मदत द्यावी म्हणून निवेदन दिले असल्याचे सांगितल्याने काही कार्यकर्त्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे.

शेवटी काहीही असो राजकीय पक्ष हे कायम श्रेय घेण्यासाठी झटत असतातच. मात्र यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचे, सामान्य नागरिकांचे प्रश्न मार्गी लागत आहेत ही खूप मोठी गोष्ट असल्याचे सर्वसामान्य नागरिकात चर्चा सुरू आहे. यंदाची मतदार संघाची निवडणूक मोठी चुरशीची होणार असल्याचे चिन्ह दिसत आहे.

# लॉयन्स क्लब परभणी येथे मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन

आधुनिक केसरी न्यूज

**परभणी :** मराठवाडा मुक्ती संग्राम दिन निमित्त मुक्ती संग्रामात योगदान देणारे महापुरुष व स्वातंत्र्य सेनानी आणि रक्तदान या दोन विषयांवर चित्रकला स्पर्धा घेण्यात आली या चित्रकला स्पर्धेत परभणी महानगरातून उदंड प्रतिसाद मिळाला 25 शाळांचे एकूण पाच हजार विद्यार्थी या चित्रकला परीक्षेत बसले व त्यांनी चित्रे काढून या स्पर्धेत सहभाग नोंदवला 25 शाळातील प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ असे माध्यमिक व प्राथमिक या दोन्हीही विभागातून सहा सहा बक्षीस प्रत्येक शाळेतील मुलांना देण्यात आले यावेळी शाळेतील चित्रकला शिक्षकांचा सत्कार करण्यात आला एकूण अडीचशे बक्षीस वाटण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लॉयन अरुण टाक यांनी केले अध्यक्ष लॉयन अशोक शेलगावकर रिजन चेअर पर्सन श्रीकांत मणियार झोन चेअर पर्सन अनिल कालसुरकर व सचिव अरुण टाक उपाध्यक्ष नितीन पारवेकर यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमात महाराष्ट्र शासन उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार प्राप्त सुप्रिया श्रीमाळी यांचा सत्कार करण्यात आला सर्व विद्यार्थ्यांना व शिक्षकांना पुरस्काराचे वितरण झाले. परभणी महानगरातील सर्वच लॉयन क्लबचे सदस्य पदाधिकारी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शन नितीन पारवेकर व प्रवीण मुदगलकर यांनी केले.




# मौजे ईरगाव येथे मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन मोठ्या उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**दशरथ आंबेकर**

**किनवट :** १७ सप्टेंबर २०२३ रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मौजे ईरगाव येथे मोठ्या उत्साहात शालेय विद्यार्थीनींनी मुख्य रस्त्याने प्रभात फेरी काढली होती.तर तत्पूर्वी मुख्य ध्वजारोहण करुन ईतर कार्यक्रम घेण्यात आले होते. तिसऱ्या वर्गातील विद्यार्थी कु.चेतन गंटलवाड याने सुंदर आवाजात गीते गायन करून शाळेत आनंदमय वातावरण निर्माण केले होते.दिंनाक -१७ सप्टेंबर२०२३रोजी मराठवाडा मुक्ती



संग्राम दिनाचे औचित्य साधून इयत्ता पहिली ते पाचवीच्या सर्व विद्यार्थ्यांना१७सप्टेंबर२०२३रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे महत्त्व आपल्या मनोगतात विद्यार्थी विद्यार्थिनींनी सांगितले.या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक फोले सर बंबीलगेवार सर,राठोड सर तसेच ग्रामपंचायतचे ग्रामसेवक दसकणवार, सरपंच सौ.रत्नमाला गोरे,ग्रामपंचायत सदस्य संजय देवराव मेटकर, आत्माराम गायकवाड,संभाजी मिराशे, बालाजी मिराशे,गंगाधर मांगीरवाड, अरविंद मोहिते, पत्रकार तथा प्रसिद्ध प्रमुख दशरथ आंबेकर,अंगणवाडी सेविका सौ.निर्मलाबाई मांगीरवाड सह गावातीलनागरिक,पालक,पत्रकार,शिक्षक,या सह मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर